दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७० • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.४ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# राजकारणाबद्दल माझे मत चांगले नाही इथे फक्त 'युज आणि थ्रो' केले जाते

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली खंत

**पुणे (वृत्तसंस्था)**

अनेक समाजांनी मिळून आपला देश तयार झालेला आहे. पण राजकारणाबद्दल माझे मत चांगले नाही. इथे फक्त ' युज आणि थ्रो' केले जाते. त्यामुळे पक्ष आणि संघटनेत माणूस म्हणून विचार करणे आवश्यक आहे, असे मत केंद्रीय नागरिक रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.मराठा सेवा संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमाचे पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

गडकरी म्हणाले, जगात आपल्याला विकास साधायचा असेल तर आपल्याला ज्ञान मिळवत राहिले पाहिजे. आगामी काळात ज्ञान मिळवणे हाच यशाचा मंत्र आहे. ज्ञान सोबत जीवन मूल्य देखील महत्वपूर्ण आहे. प्रत्येक मोठ्या व्यक्तीने काही आधार धरून पुढे वाटचाल केली. आपल्या देशात विचारधारा अडचण नाही तर विचार शून्यता समस्या आहे. ज्या पक्षाची सत्ता येईल त्याकडे अनेकजण उड्या मारतात त्यामुळे नेमकी विचार धारा, निष्ठा कुठे जाते. समाजातील अस्पृश्यता, विषमता आणि जातीयवाद नष्ट झाली पाहिजे. गुणवत्ता असेल तर कोणते अडथळे जीवनात येत नाही. समाजात कर्तुत्व, नेतृत्व हे संस्कारशी निगडित आहे.मी आई आणि वडील यांच्या पेक्षा छत्रपती शिवाजी महाराज यांना आदर्श मानतो. त्यांनी राज्य करताना अनेक लढ्या जिंकल्या पण कोणत्याही धार्मिक स्थळे उद्ध्वस्त केली नाही, कोणावर अत्याचार केला नाही, सर्व धर्म समभाव असलेले हिंदुस्थान मधील एकमेव राजा छत्रपती शिवाजी महाराज आहे. मराठा समाजासाठी खेडकर यांनी काम केले. गडकरी पुढे म्हणाले, खेडेकर यांनी लिहिलेल्या पुस्तकात सामाजिक जाणीव असून समाजात गरजू यांचे काम करण्यास वेळ दिला पाहिजे. ज्यांचे आई वडील चांगले संस्कार घरी करतात तेच मुले पुढे उत्तम होतात. जिजाऊ माँ यांनी चांगले संस्कार शिवाजी राजे यांच्यावर केल्याने ते उत्तम राजे झाले आहे. कोणी किती मोठे आणि श्रीमंत असेल तरी संस्कार आवश्यक आहे. जिजाऊ, शिवाजी महाराज यांच्यापासून प्रेरणा घेऊन भविष्य पिढी घडवावी.राजकारण मध्ये प्रत्येकाला पद हवे आहे कोणाला पद नको असे कधी म्हणत नाही. पक्षाचा ठप्पा लागला की मर्यादा येतात. खेडेकर यांनी कधी राजकारणात येऊन पद मिळावे अपेक्षा केली नाही तर त्यांनी लोकप्रतिनिधीपेक्षा मोठे काम उभारले आहे. समृध्द, संपन्न समाज निर्माण झाला पाहिजे.नोकरी पेक्षा व्यवसायिक बना त्यातून उद्यमशीलता निर्माण होऊन समाजाचा विकास होईल. समाजाचां सर्वांगीण विकास होण्यासाठी काम करणे गरजेचे आहे तरच लाखोंचे आयुष्य बदलले पाहिजे. नागपूर विमानतळ वरून शेतकरी यांनी तयार केलेल्या जैविक इंधनवर विमान उड्डाण झाले पाहिजे यादृष्टीने काम करण्यात येत आहे.



### देवेंद्र फडणवीस चुकीच्या लोकांनी वेढलेले

## त्याचा परिणाम महाराष्ट्राला भोगावा लागत असल्याचा खासदार संजय राऊत यांचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अडीच वर्षे चुकीच्या लोकांनी वेढलेले आहेत. त्याचा परिणाम महाराष्ट्राला भोगावा लागत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मात्र, ते दैनिक सामाना वाचत आहेत, ही चांगली बाब असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या दैनिक सामनामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करण्यात आल्यानंतर फडणवीस यांनी देखील शिवसेनेचे आभार मानले होते. यावर संजय राऊत यांना प्रश्न विचारण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते.

सामना वाचने ही एक सुंदर सवय आहे. जे सामना वाचतात त्यांचे भविष्य उज्वल असते. सामना हा सगळ्यांचा आहे. मग ते सत्ताधारी पक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील. दैनिक मराठा नंतर दैनिक सामना सत्य - असत्य स्पष्टपणे मांडत आला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री म्हणून गडचिरोली मध्ये उत्तम काम केले. त्यामुळे आम्ही त्यांचे कौतुक केले. तर बीड प्रकरणात आम्ही त्यांच्यावर टीका केली. त्यानंतर या प्रकरणात तपासाने गती घेतली असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. कोणी चांगले काम केले असेल तर त्याचे कौतुक करायला हवे, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.सुरेश धस जे बोलत आहेत ते फडणवीस यांच्या आदेशानेच बोलत असणार, असे देखील संतय राऊत यांनी म्हटले आहे. फडणवीसांच्या आदेशाशिवाय ते शक्य नसलयचा दावा राऊत यांनी केला आहे. कदाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देखील बीडमधील दहशतवाद संपवायचा असल्याचे दिसते, असा विश्वास देखील राऊत यांनी व्यक्त केला.पोलिस आणि



सीआयडीवर जनतेचा आणि विरोधी पक्षांचा दबाव आहे. त्यामुळे सध्या पोलिस करत असलेला तपास योग्य दिशेने सुरू असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस यांना देखील बीड मधील दहशतवाद येथील बंदुकीचे राज्य मोडून काढायचे आहे, असे दिसत असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांवर आपण विश्वास ठेवायला हवा, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे या तपासात बाधा येईल, असे सध्या काहीही बोलणार नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.भारतीय जनता पक्ष यापुढे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासोबत निवडणुका लढणार नाही. महापालिका तर सोडूनच द्या, विधानसभेत देखील भाजप स्वबळावर लढेल, असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. बिहारमध्ये नितेश कुमार यांचा पक्ष एनडीएमध्ये असून देखील त्यांच्याच पक्षाचे खासदार फोडण्याचे काम भारतीय जनता पक्ष करत असल्याचा दावा संजय राऊत यांनी केला आहे. मित्र पक्षाच्या पाठीत वार करण्याची भाजपची जुनी सवय आहे. बिहारमध्ये देखील ते समोर आले असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## एखाद्यांचे नाव घेऊन आपण त्याला फासावर चढवू शकत नाही-शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

संतोष देशमुख हत्या प्रकरणी कोण मास्टररमाइंड आहे हे तपासातून समोर येऊ द्या. एखाद्यांचे नाव घेऊन आपण त्याला फासावर चढवू शकत नाही, असे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, काही कायदेशीर प्रक्रिया असतात, कोर्टदेखील पुरावे पाहून निर्णय देत असते. तातडीने कोणावर कारवाई होत नसते. कोणत्यांही पक्षाच्या नेत्यांने तपासात अडथळा आणू नये, उलट मदत करता येत असेल तर करावी.

संजय शिरसाट म्हणाले की, तपास यंत्रणेमध्ये काही अडथळा येईल असे कुणी नागू नये असे माझे मत आहे. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट भूमिका घेतलेली असताना त्यावर शंका घेण्याचे काही कारण नाही, असेही शिरसाट यांनी म्हटले आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, वाल्मीक कराड पकडला गेला असताना विरोधकांना तो पोलिस कोठडीमध्ये आहे हे पाहवलं जात नाही. त्याला संपवण्याचा प्रयत्न करताय असे म्हणतात. आता त्यांचे काय केले पाहिजे या मार्गदर्शक सूचना त्यांनी केल्या पाहिजे. त्यांना काय ५ स्टारमध्ये



ठेवले पाहिजे काय? विरोधक त्याला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, असा माझा आरोप आहे.संजय शिरसाट म्हणाले की, संजय राऊत हे आता सर्वच भूमिका सहकार्याचीच दाखवणार आहे. जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत त्यांना औषधोपचार केला आहे. म्हणून त्यांची ही नरमाईची भूमिका आहे. त्यांच्या ह्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतोय.संजय शिरसाट म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल ठाकरे गटाची बदललेली भूमिका हे वेगळ्या ट्रॅकवर जाण्याचे संकेत आहे. महायुतीत एकत्र रहा म्हणून जनतेने हे बहुमत दिले हे त्यांना कळत नाही, असा टोलाही शिरसाट यांनी राऊतांना लगावला आहे.

### मुख्यमंत्र्यांकडून कामाच्या अपेक्षा

## सुप्रिया सुळे यांचा पालक मंत्री नियुक्तीत विलंब होत असल्याच्या मुद्यावरून निशाणा

**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यात विधानसभा निवडणुकी नंतर सरकार सत्तेत आले. एवढे मोठे बहुमत मिळूनही अद्याप पालकमंत्र्यांची नेमणूक झालेली नाही. मंत्रिपद वाटपात देखील उशीर झाला व आता पालकमंत्रीपदाची नेमणूक उशिराने होत आहे. अनेक मंत्र्यांनी त्यांचा पदभार देखील अद्याप घेतलेला नाही. निवडून आल्यानंतर पदाची पूर्तता करणे सरकारची जबाबदारी असते. परंतु अद्याप पालकमंत्री नेमणूकबाबत चर्चा कुठे ऐकण्यात नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यात महत्वाच्या पदावर बसले असून त्यांच्याकडून कामाच्या अपेक्षा आहे, असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, लाडकी बहीण योजना केवळ निवडणुक पुरती मर्यादित होती. मी आधी देखील सांगितले होते की, निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजनेस अपेक्षित ठेवले जाईल त्याप्रमाणे होत आहे. फडणवीस यांच्याकडून लोकांच्या अधिक अपेक्षा आहे. राज्याचा फिक्सल डिपॉझिट रिपोर्ट पाहिला तर पैशांची मोठी तफावत दिसून येते. त्यामुळे आर्थिक धोरणावर देखील त्यांनी भाष्य केले पाहिजे. राज्य व केंद्र यांचे नाते पाहिले आहे मी देखील लवकरच याबाबत आकडेवारी देईल. डीपीडीसीचे पैसे इतर कामात वळवले जात आहे. अजित पवार



मागील १५ दिवस कोणतेही वक्तव्य करत नाही. परंतु मुख्यमंत्री रोज दिसत आहे. कोण काम करत आहे. एकनाथ शिंदे देखील दिसतात. लवकरच बजेट सादर होणार असून आम्हाला देखील राज्याचे प्रश्न मांडायचे आहे. आम्हाला अपेक्षा आहे की मुख्यमंत्री फडणवीस आम्हाला सगळ्यांना बजेट पूर्वी चर्चेसाठी बोलावतील.

बीड प्रकरणातील आरोपींना उशीरा अटक झाली. पण त्यांना पुण्यातूनच अटक कशी होते? हा प्रश्न आहे. पोलिस यंत्रणा यांनी याबाबत एक अधिकृत पत्र काढले पाहिजे. दिल्लीत देखील या केसची चर्चा आहे. अनेकजण तपासाबाबत विचारणा केली, असे मत सुळे यांनी व्यक्त केले.

## ठाकरे गटाचे तीन माजी नगरसेवक दोन पदाधिकारी शिंदेंच्या शिवसेनेत

**पुणे (वृत्तसंस्था)**

आगामी महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहर व तालुक्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विशेषतः शिवसेनेच्या ठाकरे गटाला मोठी गळती लागली आहे. ठाकरे गटाचे शहरातील तीन माजी नगरसेवक, दोन पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. तर, दोन माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे माजी सभापती यांच्यासह दोन पदाधिकाऱ्यांनी शिंदे यांच्याशी चर्चा केली. त्यांच्यासह नगर तालुक्यातील इतरांचा प्रवेश रविवारी ठाणे येथे प्रवेश होणार आहे.



विधानसभा निवडणुकीत अहिल्यानगर शहरातील विधानसभा मतदारसंघाची हक्काची जागा सोडल्याने ठाकरे गटाच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे सुमारे १२ ते १५ नगरसेवक पक्ष सोडण्याच्या तयारीत आहे. त्यातील प्रशांत गायकवाड, दत्ता जाधव व दीपक खैरे या तिघांसह शोभना चव्हाण, दिलीप सातपुते यांनीही जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहर प्रमुख सचिन जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात प्रवेश केला. तसेच नगर तालुक्यातील माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, शरद झोडगे, माजी पं. स. सभापती रामदास भोर, उपतालुका प्रमुख प्रकाश कुलट, सुशील कदम यांनीही ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देण्याची तयारी केली आहे. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली. रविवारी ते व तालुक्यातील इतर सदस्य, पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे सांगण्यात आले.राष्ट्रवादी, भाजपकडूनही ठाकरे सेनेतील नगरसेवकांची संपर्क ठाकरे गटातील बहुतांशी नगरसेवक शिंदे गटात जाणार असले, तरी काही नगरसेवक मात्र प्रभाग रचना व निवडणुकीतील संभाव्य पॅनल याचा विचार करून पक्षांतराचा निर्णय घेणार आहेत. काही नगरसेवक अजित पवारांच्या राष्ट्रवादी सह भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्याही संपर्कात असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मनपा निवडणुकीपूर्वी मोठी राजकीय उलथापालट होण्याची शक्यता आहे.इतर नगरसेवक संपर्कात, लवकरच त्यांचाही प्रवेश ठाकरे गटातील बहुतांश नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. त्यांच्याशी चर्चा झाली आहे. काहींशी चर्चा सुरू आहे. त्यांचाही लवकरच प्रवेश होणार आहे. नगर तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व इतर पदाधिकारी रविवारी ठाणे येथे प्रवेश करणार असल्याचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व शहरप्रमुख सचिन जाधव यांनी सांगितले.

## मसाजोग सरपंच हत्या प्रकरण फरार आरोपी सुदर्शन घुले,सुधीर सांगळे पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी ताब्यात घेण्यात आलेल्या सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि सिद्धार्थ सोनवणे या तीनही आरोपींना १४ दिवसांची सीआयडी कोठडी देण्यात आली आहे. केज न्यायालयाचे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी एस व्ही पावसकर यांनी ही शिक्षा सुनावली आहे. या तीनही आरोपींना २५ दिवसांनंतर अटक करण्यात आली आहे. मस्सोजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पंचवीस दिवसानंतर, तीन मुख्य आरोपींना अटक करण्यात यश आलं आहे. फरार असलेला मुख्य आरोपी सुदर्शन घुलेसह सुधीर सांगळेच्या मुसक्या एसआयटीच्या पथकाने बालेवाडीत आवळल्या. अद्याप या प्रकरणातील आणखी एक आरोपी कृष्णा आंधळे मात्र फरार आहे. आरोपींना मदत करणाऱ्या डॉ. संभाजी वायभसेंनाही पोलिसांनी ताब्यात घेतलंय. त्याच्याच चौकशीत या आरोपींचा ठावठिकाणा कळाल्याचं सांगण्यात येतंय. या दोन मुख्य आरोपींसह, हत्येच्या दिवशी सरपंचाचा ठावठिकाणा दिल्याच्या संशयाखाली कल्याणमधून सिद्धार्थ सोनवणेला ताब्यात घेतलं आहे. सिद्धार्थ सोनवणे हा मस्साजोगचाच रहिवासी आहे. सरपंचाची हत्या झाल्यानंतर तो गावातच होता. याशिवाय अंत्यविधीला देखील तो उपस्थित होता.

# जिल्ह्यातील सौर प्रकल्पांच्या कामांना गती द्या : सालीमठ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना अखंडित वीज उपलब्ध व्हावी यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू केली आहे.या योजनेअंतर्गत जिल्ह्यात सौर प्रकल्पासाठी प्रशासनाने जमीन उपलब्ध करून दिली असून प्रकल्पांच्या कामांना संबंधित संस्थेने गती द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.



जिल्ह्यातील सौर प्रकल्पांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.या बैठकीस पोलीस अधीक्षक राकेश ओला (दूरदृश्यप्रणालीद्वारे), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, महावितरण आणि वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

श्री.सालीमठ म्हणाले, जामखेड तालुक्यातील रत्नापूर येथे दोन ते तीन दिवसात काम सुरू करावे.कर्जत तालुक्यातील बेलवंडी येथील जुन्या गावठाणातील जागा सौर प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव तयार करावा आणि संस्थेने तेथील काम तातडीने सुरू करावे.याच बांभोरा उपकेंद्राच्या परिसरात १० मेगावॅट प्रकल्पासाठी ३० एकर जागा निश्चित करण्यात यावी.

शासकीय सौर प्रकल्पांना विरोध करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करावी.जामखेड तालुक्यातील खर्डा येथे तांत्रिक अडचणी असल्याने वाकी आणि नायगाव येथील जागेला भेट देऊन प्रकल्प उभारणीच्या दृष्टीने पाहणी करावी.राहाता तालुक्यातील केळवड येथील प्रकल्पाचे काम त्वरित सुरू करावे.या ठिकाणी जागेची उपलब्धता लक्षात घेऊन ५ मेगावॅट पेक्षा अधिक वीज निर्मितीसाठी प्रयत्न करावे.

अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव प्रकल्पाचे काम सुरू करावे,त्या जागेकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी प्रस्ताव तयार करावा.श्रीगोंदा तालुक्यातील खरातवाडी येथील नागरिकांशी संवाद साधून काम सुरू करण्यात यावे.शेवगाव तालुक्यातील दहिगाव, शहर टाकळी परिसरात प्रकल्पासाठी जागेचा शोध घेण्यात यावा. खापरेवडी, हकलापूर, राहाता, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ, श्रीरामपूर सूतगिरणी परिसर, राहुरी तालुक्यातील वांबोरी, पारनेर मधील लोणी मावळा, जावळा , राळेगाव, नेवासा एमआयडीसी, संगमनेर मधील पेमगिरी, कोपरगाव तालुक्यात चास,आणि जामखेड तालुक्यातील राजुरी येथे देखील जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी,अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

संबंधित संस्थेने भाडेतत्त्वावर खासगी जागेचा शोध घ्यावा, प्रशासनातर्फे समन्वय साधण्यासाठी सहकार्य करण्यात येईल,असेही त्यांनी सांगितले.सौर प्रकल्पाची कामे करतांना सुरक्षेच्या दृष्टीने समस्या येऊ नयेत यासाठी पोलिसांचे सर्व सहकार्य राहील असे पोलीस अधीक्षक श्री.ओला यांनी सांगितले. कर्जत तालुक्यातील निमगाव डाकू येथे प्रकल्पाचे काम सुरू झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**सोलापूर । प्रतिनिधी**

विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात विजयश्री सभागृहात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून करमाळा तालुक्याचे युवा नेते दिग्विजय भैया बागल, संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, प्रा. नितिन तळपाडे, भाजप जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, जिल्हा उपाध्यक्ष श्याम सिंधी, आणि तालुका अध्यक्ष सचिन पिसाळ उपस्थित होते.

प्रा. नितिन तळपाडे यांनी सावित्रीबाईंच्या ऐतिहासिक कार्याचा उल्लेख करत महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या क्रांतीचे महत्त्व सांगितले. दिग्विजय भैया बागल यांनी सावित्री ही माझी आई आहे असे म्हणत महिलांच्या कार्याचा गौरव केला. विद्यार्थिनी वैष्णवी खोमणे हिने मी सावित्री बोलते या नाट्यमय शैलीतून सावित्रीबाईंच्या जीवनपटाचे सादरीकरण केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील यांनी सावित्रीबाईंच्या प्रेरणादायी कार्यावर भाष्य करत प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक सावित्री उभी असते असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनिता देशमुख-साठे यांनी केले, तर आभार प्रा. एम.डी. जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती

# टाकळी येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**भंडारा । प्रतिनिधी**

सवित्रीबाई फुले भारतीय समाज सुधारक आणि शिक्षिका होत्या. त्या महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या पहिल्या महिला मानल्या जातात. त्यांच्या शिक्षण आणि सामाजिक सुधारणा भारतीय समाजात महत्त्वपूर्ण बदल घडवण्यासाठी योगदान दिले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सावित्रीबाईंच्या विचारांचे अनुकरण करण्याची आज गरज आहे, असे प्रतिपादन ओबीसी क्रांती मोर्च्याचे अध्यक्ष संजय मते,यांनी

टाकली येथे नवनाथ मंदिराच्या परिसरात सावित्रीबाई फुले यांची जयंतीनिमित्त मार्गदर्शन करतांना बोलत होते.



टाकली येथे नवनाथ मंदिराच्या परिसरात सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात ओबीसी क्रांती मोर्च्याचे अध्यक्ष संजय मते, शहीद भगतसिंग प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिकेसह सर्व शिक्षक आणि शालेय विद्यार्थ्यांसह वॉर्डातील महिला आणि पुरुष उपस्थित होते. उपस्थितांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून पूजन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जगन्नाथजी नेरकर, प्रकाशजी देशकर, , बड़ीभाऊ देशकर, अरुण भेदे, मधुजी चौधरी, सुधीरभाऊ यूरकुडे, पुरुषोत्तम नंदुरकर, अमोल देशकर, राजेंद्र भेदे, रेवानाथ नेरकर, संदेश झेलकर, गोलू ठाकरे, योगेश उपरिकर, जोद्रुजी राऊत, प्रशांत गयाढ़ने, पन्नालाल उपवंशी, सुनिल भेदे, कुंजबिहारीनाथ नेरकर, लखन बनकर, बालू नेरकर, धनंजय देशकर, सोमनाथ नेरकर, रवीजी डोंगरवलर, चंद्रकलाताई भोपे, नगर सेविका, अर्पनाताई भेदे, देशकर ताई, हर्षिताताई नेरकर, ज्योति नंदुरकर, कल्पना कांबळे, तुलसी नगरधने, आकांशा गायधने, मायाबाई निर्वाण, मंजूषाताई हजारे, संगीताताई कांबले, शालुताई भेदे, ज्योति भेदे, अर्चना नगरदने, प्रणाली नागोरवर आणि स्वाती थवकर यांचा समावेश होता.

कार्यक्रमाने उपस्थितांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आठवण करून दिली आणि त्यांच्या आदर्शांचा आदर करण्याची प्रेरणा दिली.

# भद्रावती येथे वाकथॉन -२०२५ वाक फॉर बचपन फलकाचे अनावरण

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती हे नाव शिक्षण , संशोधन , क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात आपला कर्तुत्वाने अर्ध शतकापासून सुपरीचित आहे. उपरोक्त क्षेत्रात संस्था दरवर्षी अनेक विविध कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. भद्रावतीकरांच्या सुदृढ आरोग्याच्या व राष्ट्रनिर्मितीच्या उद्देशाने भद्रावती शिक्षण संस्था मागील काही वर्षांपासून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करीत आहे.मागील वर्षात रन फॉर युनिटी, रन फॉर डॉटर, रन फॉर फ्रेंडशिप व रन फॉर महाराष्ट्र चे आयोजन या संस्थेद्वारे संस्थेद्वारे केले आहे. भद्रावती परिसरातील नागरिकांकडून या स्पर्धांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.




यावर्षी भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावतीचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांच्या संकल्पनेनुसार दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ७ वाजता रन फॉर बचपन या बिरुद्धाने वाकथॉन स्पर्धा -२०२५ चे आयोजन केले आहे. त्या फलकाचे अनावरण लहान मुलांच्या हस्ते जुने बस स्टॅन्ड भद्रावती येथे करण्यात आले.ही स्पर्धा यशवंतराव शिंदे कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणातून सुरुवात होऊन गौराळा गेट व परत अशी राहणार आहे. या वाकथॉन स्पर्धेला लहान मुलांपासून तर वयोवृद्धांपर्यंतचे सर्व लोक उपस्थित राहणार आहेत.याकरिता लहान मुलांपासून तर थोरांपर्यंत सर्वांनी लहान मुलांच्या गणवेशात सहभाग घ्यावा असे आवाहन भद्रावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. विवेक शिंदे यांनी केले आहे. तसेच या दिवशी आपण एक दिवस लहान मुलांप्रमाणे जीवन जगावे की ज्यामुळे आपले मन पुन्हा एकदा नवीन आयुष्य जगण्याकरिता रिचार्ज होईल हा या स्पर्धे मागचा उद्देश होय असे आपल्या आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपले मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. कार्तिक शिंदे, डॉ. विशाल शिंदे, प्रा. धनराज आस्वले, प्राचार्य एल. एस. लडके, प्राचार्य जयंत वानखेडे, प्राचार्य डॉ. सुधीर मोते, प्राचार्य ताजने, अविनाश सिद्धमशेट्टीवार, शेखर सिंग, बंग , मोहित रॉय, नकुल शिंदे, किशोर खंडाळकर, अजय आसुटकर तसेच भद्रावतीतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# जलसंपदामंत्री विखे पाटील यांना डॉक्टर ऑफ सायन्स पदवी

**राहाता । प्रतिनिधी**

जलसंपदा मंत्रीराधाकृष्ण विखे पाटील यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स ही मानाची पदवी देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठाच्या २६ व्या पदवीदान समारंभामध्ये ही पदवी प्रदान केली जाणार आहे.



मंत्री विखे पाटील यांनी शेती, सहकार, शिक्षण या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीने सन्मानित करण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मंत्री विखे पाटील यांना जीवन गौरव पुरस्काराने आणि राहुरी येथील महात्मा फुले कृषि विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स पदवी देऊन सन्मानित केले होते.

विखे पाटील यांनी आपल्या राजकीय, सामाजिक वाटचालीत अनेक महत्वपूर्ण पदांवर काम करून सामाजिक हिताचे निर्णय घेतले. यामध्ये प्राध्यान्याने कृषि व पणनमंत्री असताना शेतकरी हिताच्या निर्णयांमुळे कृषि क्षेत्राला नवी दिशा मिळाली. शेतकरी ते ग्राहक ही योजना पहिल्यांदा राज्यात सुरू करून शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला नवी बाजारपेठ मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

शेतकरी गट आणि फार्मर्स प्रोड्यूसर कंपन्यांना त्यांनी मंत्रीपदाच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले होते. आरोग्य क्षेत्रामध्ये पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, प्रवरा मेडीकल ट्रस्ट या माध्यमातून समाजासाठी आरोग्याच्या सुविधाही त्यांनी निर्माण केल्या.

जनसेवा फौंडेशनच्या माध्यमातून महिला बचतगटांची चळवळ सुरू करून, ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी आणि लखपती दिदि योजनेतून अर्थसहाय्य करण्यासाठी मंत्री विखे पाटील यांचा चांगला पुढाकार राहिला आहे. मंत्री विखे पाटील यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देऊन सन्मान केल्याबद्दल त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

# आज सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव व गुणवंताच्या गुणगौरव व सत्कार सोहळा आयोजित

**तळोधी (बा) । प्रणय बांगरे**

ज्योती सावित्री सत्यशोधक माळी समाज बहुउद्देशीय संस्था व सावित्री आई फुले वाचनालय तळोधी( बा) यांच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव गुणवंताच्या गुणगौरव व सत्कार सोहळा दिनांक ५ जानेवारी २०२५ रोज रविवारला लोक विद्यालय शाळेचे पटांगण माळी समाज मंदिर जवळ येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जयश्री मोहुरले संचालिका सेवा सहकारी सोसायटी तळोदी, कार्यक्रमाचे उद्घाटक हेमलताताई भास्कर लोणबले विशेष अतिथी आमदार कीर्ती कुमार भागडीया चिमूर विधानसभा सभा क्षेत्र प्रमुख मार्गदर्शक अनिल शेंडे सेवानिवृत्त अभियंता मुख्य अतिथी डॉक्टर पल्लवी राहुल मोहूर्ले (शेंडे )वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र खंडाळा तालुका ब्रह्मपुरी ,प्रमुख उपस्थिती विलास लांजेवार, युवराज सावरकर ,परमेश्वर निके,दीपक भंडारे, गजानन गावतुरे संजय गुरनुले विलास लोथे नामदेव निकेसर विजयाताई वाढई ग्रामपंचायत सदस्य, वैशाली लांजेवार संचालिका ज्ञानज्योती सहकारी पतसंस्था तळोधी सरला गुणुले इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहे तरी या कार्यक्रमात समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष सचिन वाढई,उपाध्यक्ष चंदू निकोडे सचिव अजय बारस्कर यांनी केले आहे.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठात क्रीडा सप्ताहास प्रारंभ




**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून, या क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रवींद्र बनसोड यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. सचिन नलावडे, काष्टी (ता. मालेगाव) येथील छत्रपती शिवाजी महाराज कृषी विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नांदगुडे, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. शैलेश गडगे, कृषी अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. तुळशीदास बाष्टेवाड, डॉ. ममता पटवर्धन, प्रा. विक्रम पाटील, कॅप्टन डॉ. सुनील फुलसावंगे व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निदेशक तथा सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के उपस्थित होते.या क्रीडा सप्ताहामध्ये मैदानी क्रीडा स्पर्धा, बॅडमिंटन, बुद्धिबळ,व्हॉलीबॉल, फुटबॉल, बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो या प्रकारातील क्रीडा स्पर्धा होणार असून यामध्ये महाविद्यालयाचे २४० विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत.या क्रीडा सप्ताहाचे आयोजन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निदेशक तथा सहाय्यक कुलसचिव वैभव बारटक्के यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## नगरमधील गॅस जोडणीसंदर्भात खा.लंके यांनी वेधले लक्ष

# पेट्रोलियम कंपनी अधिकाऱ्यांसह बैठक आयोजित करण्याच्या सुचना

**पारनेर । प्रतिनिधी**

नगर शहरात भारत पेट्रोलियम कंपनीमार्फत घरगुती गॅस जोडण्या देण्याचे काम ९ सप्टेंबर २०१८ पासून सुरू असून अद्यापही संपूर्ण शहरात गॅस जोडण्या देण्याचे काम पुर्ण झाले नसल्याबाबत खासदार नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांचे लक्ष वेधले आहे. यासंदर्भात भारत पेट्रोलियम कार्पोरेशनच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्याची सुचना खा. लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनादवारे केली आहे. या निवेदनात खा. लंके यांनी नमुद केले आहे की, भारत पेट्रोलियम कार्पोरेशनच्या वतीने नगर शहरात २०१८ पासून घरगुती गॅस जोडणी देण्याचे काम सुरू असले तरी



हे काम अद्यापही अपुर्ण आहे. त्यासंदर्भात आपणाकडे स्थानिक नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. गेल्या सहा वर्षांपासून हे काम सुरू असताही हे काम पुर्ण झालेले नाही.

ही योजना केंद्र सरकाची असून संपूर्ण शहरात गॅस जोडणी देणे हे केंद्र सरकारचे उददीष्ट होते. परंतू भारत पेट्रोलियम कार्पोरेशनने हे उद्दिष्ट अपूर्ण ठेवलेले आहे.

संसदीय हिवाळी अधिवेशनादरम्यान आपण स्वतः केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरजितसिंह पुरी यांची भेट घेत या प्रश्नासंदर्भात चर्चा केली होती. त्यावेळी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करून या प्रश्नातून मार्ग काढण्यासंदर्भात मंत्री हरजितसिंह पुरी यांनी सुचित केले होते. त्या अनुषंगाने कंपनीच्या जबाबदार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्याची सुचना खा. लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांना केली आहे.

# स्त्री शिक्षणाच्या जनक माता सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**गंगाखेड । प्रतिनिधी**

शहरातील शिवाजी चौक, भगवती मंदिर परिसरात स्त्री शिक्षणाच्या जनक माता सावित्रीबाई फुले यांची जयंती महापुरुष जयंती समितीच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे आयोजन महापुरुष जयंती समितीचे संकल्पक माधवराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शक नारायणराव घनवटे, दिगंबर यादव, डॉ. सचिन जोशी, शिवराज मुंडे, ॲड. सुनील सावंत, प्रशांतराव कोद्रीकर, रामभाऊ गिराम, सागर यादव, राम फडणीस यांच्यासह सीमाताई घनवटे, वर्षाताई यादव,




ॲड. साधनाताई राठोड, लक्ष्मीताई आडे, ॲड. स्मिता देशमुख, ॲड. छाया सातपुते, सत्यभामा ब्याळे, सुमनताई दावलबाजे, गुन्नास भाभी, शीलाताई रत्नपारखी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेत समाजातील महिलांनी शिक्षण, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. जयंती कार्यक्रमास महापुरुष जयंती समितीचे सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चव्हाण-पाटील वस्ती शाळा वाफळे येथे बाल आनंद बाजाराचे आयोजन

**मोहोळ । प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनात शैक्षणिक ज्ञानाबरोबरच आर्थिक ज्ञान आणि व्यवसाय कौशल्य वाढविण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाण-पाटील वस्ती वाफळे येथे बाल आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी ताजा भाजीपाला, गरम गरम खाद्यपदार्थ, विविध फळे, ढोकळा, भेळ, किराणा माल यांसारख्या वस्तू विक्रीसाठी आणल्या होत्या. शाळेच्या परिसरात खऱ्या बाजाराचे स्वरूप तयार झाले होते, ज्याला पालकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेताना पालक आणि शिक्षकांनी समाधान व्यक्त केले.




या बाजारातून विद्यार्थ्यांच्या आर्थिक व्यवहार ज्ञानात वाढ झाली असून सुमारे ७ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. कु. साक्षी वसेकर हिने बाजारात ८०० रुपयांची विक्री करत सर्वाधिक योगदान दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा अडसूळे, शिक्षक भडकवाड सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत शिवाजी पाटील, उपाध्यक्ष नुतन गणेश वसेकर, तसेच सर्व सदस्यांनी मेहनत घेतली.

या प्रसंगी शिवाजी पाटील, शरदचंद्र शिवाजी पाटील, अक्षय चव्हाण, संजय चव्हाण, गणेश वसेकर, पंडित पाटील, बापू चव्हाण, चेतन पाटील, संभाजी पाटील, वस्तीवरील पालक व माता भगिनी उपस्थित होते.

*विद्यार्थ्यांच्या आर्थिक ज्ञानाचा पाया भक्कम करणाऱ्या या उपक्रमाने परिसरात कौतुकास्पद ठरले आहे.

# मराठी बोलण्यास सांगितल्याने तरुणाला कान धरून माफी मागण्यास भाग पाडले

**मुंब्रा । ठाणे**



कल्याण येथील मराठी कुटुंबावर झालेल्या हल्ल्याची घटना ताजी असतानाच, मुंब्रा येथे मराठी बोलण्याची मागणी करणाऱ्या २१ वर्षीय तरुणाला कान धरून माफी मागण्यास भाग पाडल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. माफी मागतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

गुरुवारी, कौसा भागातील एका फळविक्रेत्याशी झालेल्या वादानंतर या तरुणाला अपमानास्पद वागणूक दिल्याचे समोर आले. विशाल गवळी असे या तरुणाचे नाव असून, त्याने फळविक्रेत्याला मराठीत बोलण्यास सांगितले होते. यावरून वाद निर्माण झाला आणि फळविक्रेत्याने त्याच्या सहकाऱ्यांना बोलावून घेतले. त्यानंतर या गटाने गवळी याला कान धरून माफी मागण्यास भाग पाडले.

या घटनेनंतर फळविक्रेत्याने विशालविरोधात शिवीगाळ व धमकावल्याचा तक्रार अर्ज दाखल केला. पोलिसांनी त्यावर अदखलपात्र गुन्हा नोंदवला. मात्र, तरुणाला माफी मागण्यास भाग पाडणाऱ्या आठ ते दहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरा सुरू होती.

या घटनेनंतर विशाल गवळी याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे प्रमुख अविनाश जाधव यांची भेट घेतली. गवळी याने सांगितले की, त्याला धमक्या येत असून तो घाबरलेला आहे. जाधव यांनी मनसे त्याच्या पाठीशी असून त्याला पूर्ण संरक्षण दिले जाईल, असे जाहीर केले.

महाराष्ट्रात मराठी बोलणे हा गुन्हा आहे का? असा सवाल करत जाधव यांनी या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला आहे. तसेच संबंधित आरोपींविरोधात कठोर कारवाई होण्याची मागणी केली. आता कुणीही गवळीला त्रास देण्याचा प्रयत्न केला, तर मनसे त्याला घरात घुसून प्रत्युत्तर देईल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. अशा घटनांनी मराठी अस्मिता पुन्हा चर्चेत आली आहे आणि समाजात अशांतता निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आह

# तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धेत समीक्षा भेंडारकर प्रथम



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यात मीनाताई माध्यमिक विद्यालय, नवखळा येथे ३१ डिसेंबर २०२४ रोजी पार पडलेल्या तालुकास्तरीय नवरत्न स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पारडी (ठवरे) शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

कथाकथन स्पर्धेत उच्च प्राथमिक गटात समीक्षा सुधाकर भेंडारकर हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर एकपात्री भूमिकाभिनय स्पर्धेत देवयानी प्रकाश ठवरे हिने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. समीक्षा भेंडारकर हिची जिल्हास्तरीय नवरत्न स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

मार्गदर्शनासाठी शिक्षक सबोध हजारे (विज्ञान) व अशोक शेंडे (भाषा) यांनी विशेष मेहनत घेतली. याशिवाय सुनील हटवार, धनराज पडोळे, गौतम राऊत, संदीप भुसारी, आणि रितेश तितरमारे यांनी सहकार्य केले.

मुख्याध्यापक अशोक शेंडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप मेश्राम, उपाध्यक्ष नितेश शेंडे, आणि समिती सदस्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मिंडाळा केंद्राचे केंद्रप्रमुख प्रदीप मोटघरे, गटशिक्षणाधिकारी संजय पालवे, आणि विस्तार अधिकारी सुनीता भंडारे यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल कौतुक व्यक्त केले आहे.

# घनकचरा डेपोला लागलेल्या आगी मुळे राष्ट्रीय महामार्गावर धुराचे लोळ

## अग्निशामक दलाच्या जवानांनी वेळेत हस्तक्षेप करून आग नियंत्रणात आणली

**उमरखेड । प्रतिनिधी**

नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील महागाव रोडवरील घनकचरा संकलन डेपोला दुपारी १२:३० वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागल्याने महामार्गावर आणि परिसरात धुराचे लोळ पसरले. या घटनेमुळे महामार्ग अक्षरशः काळवंडून गेला होता, तसेच परिसरातील गोरोबा नगर, चरडे नगर आणि पाटील नगरसह इतर भागांमध्ये नागरिक त्रस्त झाले.

आगीमुळे सुमारे दोन तास परिसरात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली होती. महामार्गावर धुरामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. कचरा संकलन डेपोच्या सुपरवायझरने नगरपालिकेच्या अग्निशामक दलाला तत्काळ माहिती दिली. अग्निशामक दलाच्या जवानांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात आणली.सुपरवायझरच्या म्हणण्यानुसार, कचऱ्यात कुणीतरी विस्तव टाकल्यामुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जरी आग नियंत्रणात आणली असली तरी घाणीमुळे निर्माण झालेल्या धुरामुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास जाणवत होता. उशिरापर्यंत धूर पसरत असल्याने नागरिक व महामार्गावरील प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.नागपूर-तुळजापूर महामार्गावर असलेला महागाव रोडच्या कडेला स्थित घनकचरा संकलन डेपो हा आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहे. त्यामुळे हा डेपो गावाबाहेर हलविण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.





# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी समाजातील परिवर्तनासाठी प्रेरणादायी कार्यक्रम

## विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि स्त्री सक्षमीकरणासाठी नवचेतना

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा, सावित्रीबाई फुले जयंती निमित्त रमाबाई आंबेडकर वार्ड भंडारा येथील समाजमंदिरात बौद्ध विहार समितीतर्फे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सावित्रीबाई फुले अभ्यासिकेत झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नगर परिषद भंडारा चे माजी उपाध्यक्ष आशु गोंडाणे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका शुभांगीताई खोब्रागडे, प्रा. हेमाताई गजभिये, रणजित नंदागवळी, योगेश शेन्डे, तसेच जेष्ठ नागरिक कृष्णाजी कांबळे तसेच अरुण अंबादे उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण आणि दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यानंतर वक्त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या क्रांतिकारी विचारांमुळे शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरणात झालेले बदल यावर चर्चा केली. विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी भाषणांनी कार्यक्रमाला विशेष उंची प्राप्त झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य अर्जुन गोडबोले यांनी केले, तर माधवी बन्सोड यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंत नंदेश्वर, कैलास टेभुर्णे, धमेंद्र बडोले, सुधिर बडोले, बालकदास कोटांगले, अतुल नंदागवळी, विद्या साखरे, अर्चना नंदेश्वर, प्रज्ञा नंदेश्वर, भावना नंदेश्वर, मयुरी राऊत तसेच विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.वार्डातील नागरिक व विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती हा कार्यक्रमाच्या यशाचा प्रत्यय देणारा ठरला. सावित्रीबाईंच्या विचारांनी प्रेरित होऊन नव्या पिढीला शिक्षण व सामाजिक परिवर्तनासाठी पुढे येण्याची प्रेरणा मिळाली.

# तळोधी (बा) येथे संताजी जगनाडे महाराज जयंती महोत्सवाचे आयोजन

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

जय संताजी तेली समाज तळोधी बाळापुर च्या वतीने ५ जानेवारी २०२५ रोजी तेली समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०० वी जयंती महोत्सवाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम तळोधी (बाळापुर) येथील राधाकृष्ण मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय, या कार्यक्रमात वधु वर परिचय संमेलन आणि गुणवंतांचा गुणगौरव समारंभ देखील होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. एस. एस. कावळे, प्र-कुलगुरू गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश बावनकर, माजी पोलीस पाटील बाम्हनी तळोधी उपस्थित राहतील. प्रमुख अतिथी म्हणून आमदार कीर्तीकुमार भांगडिया (चिमूर विधानसभा क्षेत्र), घनश्यामजी डुकरे (माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती चिमूर), गणेश तर्वेकर



(माजी उपनगराध्यक्ष नगरपरिषद नागभिड), स्वप्निल तुळसकर (संचालक हब-आप कॉम्पिटिटिव्ह कम्युनिटी क्लासेस नागपूर) आणि ममता डुकरे (भिसी) यांच्या उपस्थितीची अपेक्षा आहे.

कार्यक्रमाची रुपरेषा अशी आहे की, सकाळी १०.३० वाजता तळोधी नगरातून श्री संताजी महाराज यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढली जाईल. दुपारी १२ वाजता जयंती महोत्सव कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर, १ वाजता गुणवंतांचा गुणगौरव सोहळा होईल. १.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होईल, तसेच २ वाजता वधु वर परिचय संमेलन आयोजित केले जाईल. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी मार्गदर्शन करणार आहेत.

दुपारी ४.३० वाजता समाज बांधवांसाठी स्नेहभोजन देखील आयोजित करण्यात आले आहे. यावेळी समाजाचे अध्यक्ष प्रा. अतुल कामडी, उपाध्यक्ष गौरव देशमुख, सचिव संजय डफ, प्रसिद्धी प्रमुख गोकुल पाकमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली समाज बांधवांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात उपस्थित राहावे. हा महोत्सव संताजी जगनाडे महाराज यांच्या कार्याला वंदन करणारा आणि समाजाची एकजूट वाढविणारा एक मोठा सोहळा ठरणार आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात बॉक्सिंग कौशल्य विकास शिबिराचे उद्घाटन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील श्री महायोगी अरविंद सभागृहात तांत्रिकदृष्ट्या, तंत्रशुद्ध बॉक्सिंग कौशल्य विकास शिबिराचे उद्घाटन आमदार करण देवतळे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिर उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान होते. विशेष अतिथी म्हणून आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॉक्सिंग प्रशिक्षक, बॉक्सिंग संघाचे मुख्य प्रशिक्षक, तामिळनाडू इथून आलेले श्री. शिवकुमार पाल, तहसीलदार राजेश भांडारकर, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे, सुनील नामोजवार, महाराष्ट्र बॉक्सिंग संघटनेचे महासचिव डॉ.राकेश तिवारी, भद्रावती बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष ड. मिलिंद रायपुरे, बॉक्सिंग राज्य क्रीडा मार्गदर्शक विजय डोबाळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटक करण देवतळे यांनी आपल्या मार्गदर्शनात भद्रावती क्रीडा




संकुल येथे अद्ययावत क्रीडा सोयी सुविधा उपलब्ध करून देणार आणि २०३६ ऑलिंपिक मध्ये भद्रावती शहरातून ऑलम्पिक वीर घडवणार अशी ग्वाही दिली. आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षक शिवकुमार पाल यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सुविधा उपलब्ध झाल्यास नक्कीच भारताला ऑलम्पिकमध्ये पदक प्राप्त होईल आणि ते पदक भद्रावती शहरातील एखाद्या खेळाडू कडूनच भारताला मिळेल असे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेची ६ एकर जमीन क्रीडा क्षेत्रासाठी विकसित करण्यात येईल आणि ते करून देऊ असे म्हटले. विवेकानंद महाविद्यालय भद्रावती, चंद्रपूर जिल्हा बॉक्सिंग संघटना भद्रावती, भद्रावती क्रीडा संकुल समिती भद्रावती आणि भद्रावती तालुका बॉक्सिंग संघटना भद्रावती यांच्यातर्फे शॉल आणि पुष्पगुच्छ देऊन आमदार देवतळे आणि शिवकुमार पाल यांचा सत्कार करण्यात आला चंद्रपूर जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीयस्तरावर बॉक्सिंग या खेळाचे पदक प्राप्त खेळाडूंचा सत्कार पुष्पगुच्छ देऊन आमदार देवतळे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राकेश तिवारी, सूत्रसंचालन प्रा. संगीता आर. बांबोडे, आभारप्रदर्शन विजय डोबाळे यांनी केले. या कार्यक्रमाला चंद्रपूर जिल्ह्यातील बॉक्सिंग खेळाडू, बॉक्सिंग प्रेमी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता लता इंदुरकर, वर्षा कोयचाळे, रोहन मोटघरे, अलोका विश्वास, अमर भंडारवार, नेहाल डांगे, कोमल वाकडे, विद्या किनाके, प्रशांत निखाडे, प्रीती बोरकर, दिनेश धानोरकर, संजय बेले, सुनील दैदावार, विजय लांबट, डॉ. दिलीप बगडे, डॉ. अमित प्रेमचंद, शितल मांडवकर, महेंद्र तिवारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# कै.शहाजीराव पाटील विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी सादर केली विविध कला



**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील कै. शहाजीराव पाटील विद्यालय व ज्युनियर कॉलेजच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन उत्साही वातावरणात साजरे करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात माजी राज्यमंत्री कै. शहाजीराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन नरखेड औट पोस्टचे हवालदार समाधान पाटील आणि दुय्यम निबंधक बालाजी कसबे यांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाला अरुण पाटील, दिलीप मोटे, रणजित उबाळे, सूरज पठाण, प्राचार्य एम.के. मोटे, उतरेश्वर मेंडगुळे, अनिल गोडसे, शिवाजी कसबे, मोहोन मोटे यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, हिंदी गाणी, ग्रुप डान्स, वैयक्तिक नृत्य, नाटयछटा आणि समाजप्रबोधनपर नाटके अशा विविध कलांमधून आपल्या प्रतिभेचे सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थित पालक आणि प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अशोक धोत्रे यांनी केले

# विश्वनाथ घोडके यांना 'बापमाणूस' राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## जगदीश फाउंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सन्मान



**शिरूर । रमेश बनसोडे**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त, ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील गंज पेठ येथील सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित कार्यक्रमात जगदीश फाउंडेशनच्या वतीने विश्वनाथ घोडके यांना यंदाचा राज्यस्तरीय 'बापमाणूस' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

विद्यार्थी दशेपासूनच समाजसेवेची आवड असलेल्या घोडके यांचे शालेय शिक्षण महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा, तर महाविद्यालयीन शिक्षण महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारतीय बौद्ध महासभेच्या श्रीगोंदा तालुका सचिवपदाची जबाबदारी सांभाळली आणि धम्माचा प्रचार-प्रसार केला.घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे २००६ साली नोकरीच्या शोधात सणसवाडी येथे आले. खाजगी कंपनीत काम करतानाही त्यांनी समाजकार्य सुरूच ठेवले. गरजूंना मदतीचा हात देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेत २०१२ साली 'भवतू सब्ब मंगलम' संस्थेतर्फे त्यांना नारायणगाव येथे धम्मसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सणसवाडीत त्यांनी गेल्या १९ वर्षांत समाजबांधवांना सोबत घेऊन अनेक सामाजिक उपक्रम राबवले. महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी उत्साहाने साजरी करत व्याख्यानमालेचे आयोजन केले. विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यामुळे वंचित बहुजन आघाडीच्या पुणे जिल्हा पूर्व जिल्हा संघटकपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या घोडके यांनी साप्ताहिक महाराष्ट्राची भूमी आणि दैनिक लोकपरिवर्तनमध्ये पत्रकार म्हणून योगदान दिले आहे. पत्रकारितेतील योगदानाची दखल घेत त्यांची द ग्रामीण युवा पत्रकार संघाच्या शिरूर तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.या पुरस्कारामुळे माझ्या झोपडीतील चळवळीचा सन्मान झाला आहे. मी जगदीश फाउंडेशनचे तसेच 'बापमाणूस' पुस्तकाचे लेखक आयु. जगदीश ओहोळ सर यांचे मनःपूर्वक आभार मानतो, अशी प्रतिक्रिया घोडके यांनी व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त होणाऱ्या या कार्यक्रमात महाराष्ट्रभरातून मान्यवर उपस्थित राहणार आहेत. घोडके यांचा हा सन्मान त्यांच्या कार्यप्रेरणेला आणखी बळ देणारा ठरणार आहे.

## जि.प.पीएमसी शाळेत सावित्री बाई फुले जयंती उत्साहात साजरी



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड पंचायत समिती अंतर्गत तळोधी (बाळापूर) येथील जिल्हा परिषद पीएमश्री शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक आखरे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या भूमिकेत वेशभूषा धारण करून मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला बांबोडे, भोयर, पूर्वा मदनकर, हटवार, मोनिका पकमोडे, शितल पकमोडे, धकाते, सुवर्णा मसराम, मोहरकर, निवृता पाकमोडे, रेश्मा मदनकर, तारा भरडे, अनिता मोटघरे यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालकवर्ग, आणि अंगणवाडीतील बालके उपस्थित होती.

सावित्रीबाईंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संदेश देत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## रोटरी क्लबने दिले २० मुलींना दिले बॅंकिंग व विमा अभ्यास क्रमाचे संगणक प्रशिक्षण


**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** सामान्य कुटुंबातील मुली आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत. या उद्देशाने महिला सक्षमीकरण अंतर्गत २० मुलींना मोफत बॅंकिंग व विमा क्षेत्रातील अभ्यासक्रमाचे मोफत संगणक प्रशिक्षण रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने देण्यात आले. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व प्रा. संतोष मोहिते यांचे कॉम्पुटर वर्ल्ड यांच्या वतीने सामान्य कुटुंबातील मुली अत्याधुनिक शिक्षण घेऊन आत्मनिर्भर झाल्या पाहिजेत. या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन एच.डी.एफ.सी. बॅंकेच्या व्यवस्थापक शीतल बनाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा.रोहिणी पाठक,मंजुषा जोशी, प्रकल्प समन्वयक प्रा.डॉ.शैलजा बरूरे , प्रशिक्षक प्रा. संतोष मोहिते, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, बालाजी घाडगे,रुपेश रामावत,जतिन कर्णावट यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना शीतल बनाळे म्हणाल्या की मुलींना बॅंकिंग व विमा क्षेत्रात मोठी संधी उपलब्ध आहे. त्या दृष्टीने त्यांनी अभ्यासक्रम निवडावेत व प्रशिक्षण घ्यावे. रोटरी क्लब ने मिळवून दिलेल्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले. या वेळी प्रा.रोहिणी पाठक यांनी मुलींना बचत व आर्थिक सुरक्षितता या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

## आनंदवनात 'योग आणि आयुर्वेद' विषयावर राष्ट्रीय परिषद

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंदवन येथे ४ व ५ जानेवारी २०२५ रोजी 'योग आणि आयुर्वेद' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन महाविद्यालय, धन्वंतरी आयुर्वेद संशोधन संस्था (धुळे), चंद्रपूर आयुर्वेद समिती, व नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

गुरुवार्य वैद्य प्र. त. जोशी यांच्या जयंतीचे औचित्य साधून आणि बाबा व साधनाताई आमटे यांच्या समाजकार्याला ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील १८ राज्यांतील ६०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार असून, योग आणि आयुर्वेद क्षेत्रातील संशोधन व प्रगत तंत्रज्ञानावर चर्चा केली जाणार आहे.



उद्घाटन समारंभाला डॉ. विकास आमटे, डॉ. प्रशांत बोकारे, वैद्य नरेंद्र गुजराथी, वैद्य प्रवीण जोशी, सौ. पल्लवी कौस्तुभ आमटे, आणि डॉ. मन्मथ घरोटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. तानाजी बायस्कर व डॉ. गौरव हिवरे यांचे विशेष योगदान आहे.

## ग्रीगोरियन पब्लिक स्कूलमध्ये नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० विषयावर वर्कशॉप

**रोहा । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणारे (तालुका माणगाव, जिल्हा रायगड) मार्फत ग्रीगोरियन पब्लिक स्कूल, किल्ला रोहा येथे नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले.

या वर्कशॉपचा विषय नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० होता. विद्यापीठाचे प्राध्यापक तेजस महागावकर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका रॅमॉल वर्गीस, सुपरवायझर डॉ. सोमा सील, ग्रंथपाल ज्ञानेश्वर वाणी, आणि धनंजय चिपळूणकर सर उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजन शाळेच्या ग्रंथालयात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सोमा सील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## आयुष विभागातर्फे नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाची मोहीम

**सातारा । प्रतिनिधी**

आयुर्वेद शास्त्रामध्ये व्यक्तीची आरोग्य प्रकृती तपासण्याची पद्धत आहे. त्याचा उपयोग करून, देश का प्रकृति परीक्षण या अभियानांतर्गत सातारा जिल्ह्यातील नागरिकांची आरोग्य तपासणी केली जात आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना सक्षम आरोग्यासाठी योग्य मार्गदर्शन प्रदान करणे आहे. आयुष विभागाच्या या उपक्रमातून जिल्ह्यातील नागरिकांना त्यांच्या आरोग्य स्थितीची माहिती मिळणार असून, त्यासाठी कोणत्या काळजी घ्याव्यात याबद्दल योग्य मार्गदर्शन दिले जाईल.

हा उपक्रम सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला जात आहे. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व आरोग्यवर्धिनी केंद्रे याठिकाणी आयुर्वेद डॉक्टरांच्या मदतीने तपासणी केली जाईल.

अभियान यशस्वी करण्यासाठी याशनी नागराजन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेशं खलिपे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राहुलदेव खाडे, जून आयुष अधिकारी मिथुन पवार, तसेच जिल्हा रुग्णालयातील आयुष विभागाचे डॉ. संजीवनी शिंदे, डॉ. अभिजित पाटील व अभिजित गायकवाड हे कार्यरत असतील.

## नीरज आत्राम यांना राष्ट्रीय स्वामी विवेकानंद युवा सामाजिक पुरस्कार जाहीर

**वरोरा । प्रतिनिधी**



राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त समृद्धी प्रकाशन सिंधुदुर्ग, विसावा सोशल फाउंडेशन पुणे, आणि हिरकणी महिला विकास संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात आयोजित पुरस्कार सोहळ्यात वरोरा (जिल्हा चंद्रपूर) येथील कवी नीरज आत्राम यांना यावर्षीचा राष्ट्रीय स्वामी विवेकानंद युवा सामाजिक पुरस्कार जाहीर झाला आहे.हा सोहळा १२ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार भवन, गंजवे चौक, नवी पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. समाज, शिक्षण, साहित्य, उद्योग, युवक सांस्कृतिक आणि महिला अशा विविध क्षेत्रांतील असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यासाठी हा विलोभनीय कार्यक्रम होणार आहे.केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्री मुरलीधर (अण्णा) मोहोळ, अभिनेते व अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई, लक्ष्मीची पाऊले मालिकेतील प्रसिद्ध अभिनेता ध्रुव दातार, आणि संजय कुलकर्णी (सुपेकर) यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार प्रदान केला जाईल.नीरज आत्राम यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक कार्याची विशेष दखल घेत त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पुरस्कार सोहळ्याला देशभरातून अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, हा कार्यक्रम विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

## पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन

**वर्धा । प्रतिनिधी**

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्य, वर्धा जिल्ह्याच्या वतीने ६ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सत्यनारायण बजाज वाचनालय, मगनवाडी, वर्धा येथे दुपारी १२.३० वाजता होणार आहे. कार्यक्रमामध्ये जिल्ह्यातील उत्कृष्ट पत्रकार व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस, उद्घाटक महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, तर प्रमुख पाहुणे अमर काळे, खासदार, वर्धा लोकसभा मतदारसंघ; राजेश बकाणे, आमदार, देवळी-पुलगाव विधानसभा मतदारसंघ; रवी गिते, जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा; प्रमोद मकेश्वर, उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा; विजय जावंधिया, शेतकरी नेते, वर्धा; मोहन अग्रवाल, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, देवळी; संजय इंगळे तिगावकर, वरिष्ठ अधिकारी, एस.एम.ई.एस.एस. सावंगी (मेघे); डॉ. गिरीश देव, प्रशासकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम; विनोद पत्रे, संस्थापक अध्यक्ष, पत्रकार संरक्षण समिती; तसेच संदीप खडेकर, विदर्भ अध्यक्ष, पत्रकार संरक्षण समिती व्यासपीठावर उपस्थित राहतील.

सामाजिक कार्यकर्ते इम्रान राही, ज्येष्ठ पत्रकार प्रा. राजू गोरडे, कामगार नेते यशवंत झाडे, विदर्भ उपाध्यक्ष रविराज घुमे, तसेच पत्रकार संरक्षण समितीचे वर्धा कार्याध्यक्ष शेख सत्तार हे देखील प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष शशांक चतारे, जिल्हा सहसचिव सतीश काळे, जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) संदीप रघटाटे, जिल्हा संघटक प्रशांत अजानकर, जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र गोरडे, जिल्हा कोषाध्यक्ष प्रमोद भोजने, जिल्हा सचिव योगेश कांबळे, जिल्हा सहकोषाध्यक्ष इकबाल शेख, व इतर तालुका अध्यक्ष आणि कार्यकारिणी सदस्यांनी पत्रकार व नागरिकांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## विनयभंग केल्याप्रकरणी एकास पोलिस कोठडी

**सातारा । प्रतिनिधी**

एका महिलेचा विनयभंग करून तिच्या पतिला मारहाण केल्याप्रकरणी तसेच लुटमार केल्याप्रकरणी प्रथमेश अशोक सावंत (मलवडी, तालुका माण) याला दहिवडी पोलिसांनी अटक केली आहे.




पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, २ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मलवडीहून नवरा-बायको चारचाकी वाहनाने जात होते. यावेळी प्रथमेश सावंत याने त्याची मोटारसायकल मलवडी बसस्थानक परिसरात चारचाकी वाहनाला आडवी मारली. यावर बाचाबाची व झटापटी झाल्या, त्यावेळी सावंत यांनी महिलेवर अपशब्द वापरले, शिविगाळ केली आणि महिलेचे कपडे फाडून तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करत विनयभंग केला.

या घटनेदरम्यान महिलेचा पती त्यांच्यात हस्तक्षेप करण्यासाठी आल्यानंतर सावंत याने त्याच्या खिशातून साडेचार हजार रुपये काढून घेतले आणि त्यास जिवंत मारण्याची धमकी दिली.

महिलेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी प्रथमेश सावंत याच्या विरोधात दहिवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, त्याला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्याला तिनं दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

या प्रकरणी पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अक्षय सोनावणे करीत आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतले मोहटादेवीचे दर्शन

**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्रीक्षेत्र मोहटा देवी येथे अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम साळिमठ यांनी सपत्नीक नव्याने बांधलेल्या श्री मोहटादेवी मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. त्यांनी विधिवत महापूजा केली आणि परिसराच्या व्यवस्थापनाबद्दल चर्चा केली. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्यासोबत त्यांच्या पत्नी मीनाक्षी सालीमठ, पुत्र वेदांत सालीमठ, पाथर्डीचे उपविभागीय अधिकारी प्रसाद मुळे, तहसीलदार डॉ. उदय नाईक, देवस्थान समितीचे विश्वस्त शशिकांत ढगे, डॉ. श्रीधर देशमुख, डॉ. ज्योती देशमुख, वकील कुसुम देशमुख, विश्वस्त नंदकुमार खाडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी श्रीक्षेत्र मोहटादेवीच्या ऐतिहासिक महत्त्वाचा गौरव करत श्रद्धाळूंना अधिक सुविधा पुरवण्यासाठी विकासकामे प्राधान्याने करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी मोहटा देवी देवस्थानच्या समितीकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर सकारात्मक विचार करणार असल्याचे सांगितले.

देवस्थान समितीने मंदिर व्यवस्थापनातील विविध उपक्रमांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आणि भाविकांसाठी अधिक चांगल्या सुविधा उभारण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला.

मोहटादेवीचे ऐतिहासिक महत्त्व:श्री मोहटादेवी मंदिर हे अहमदनगर जिल्ह्यातील सर्वांत महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. येथे दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात. पाथर्डी तालुक्यातील हे ठिकाण ग्रामस्थ आणि श्रद्धाळूंमध्ये विशेष श्रद्धेचे केंद्र आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या मंदिरामुळे भाविकांच्या सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या या भेटीने श्रद्धाळूंमध्ये आनंद व्यक्त होत असून, मोहतादेवी परिसराच्या विकासासाठी ही भेट महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# खा.लंके यांच्या अध्यक्षतेखाली पाथर्डी तालुका आढावा बैठक



**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तहसील कार्यालयात गुरुवारी खासदार नीलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली तालुका आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पालिका हद्दीतील भूमिगत गटार प्रकल्प, पंचायत समितीमार्फत राबवल्या जाणाऱ्या शासकीय योजना आणि कृषी विभागाशी संबंधित विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या २४० कोटी रुपयांच्या भूमिगत गटार प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला गेला. रस्त्यांच्या मध्यभागी गटार खोदण्याचे काम योग्य पद्धतीने आणि नागरिकांना कमीत कमी गैरसोय होईल, अशा प्रकारे करावे, असे निर्देश देण्यात आले. या कामाचा लोकांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन ठोस उपाययोजना सुचवण्यात आल्या.

पंचायत समितीच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना वेळेत पोहोचावा, यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना आणि रेशनकार्ड वितरण प्रक्रियेसंबंधी आलेल्या तक्रारींचा आढावा घेऊन त्यावर त्वरित कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.

कृषी विभागाच्या योजनांमध्ये शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळावा, यासाठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, अशी सूचना करण्यात आली. अनुदानाचे वितरण वेगाने व पारदर्शक पद्धतीने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

चिंचपूर पांगूळ येथे मागील चार वर्षांपासून ग्रामसभा न झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर, ग्रामसभांचे नियमित आयोजन होण्यासाठी संबंधित विभागाला त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

भूमिगत गटार प्रकल्पाच्या कामाची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमण्याची शिफारस बैठकीत करण्यात आली. अहवाल आल्यानंतरच पुढील कामकाज सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

खासदार नीलेश लंके यांनी विकासकामे आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी गतीने व पारदर्शकतेने व्हावी, यासाठी अधिकार्यांना मार्गदर्शन केले. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून काम करावे, असे त्यांनी सांगितले.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस ॲड. प्रताप अर्जुन ढाकणे, प्रांताधिकारी प्रसाद बापूसाहेब मते, तहसीलदार उद्धव नारायण नाईक, पोलिस निरीक्षक संतोष दशरथ मुटकुळे, शिवशंकर धोंडीराम राजळे, रफिक नूर शेख, नासिर नूर शेख, बंडू निवृत्ती बोरुडे, गहिनीनाथ मारुती शिरसाठ, किसन अंबादास आव्हाड, अरविंद सोपान सोनटके, अर्जुन विठ्ठल धावतक, पांडुरंग भाऊसाहेब शिरसाट, वैभव भास्कर दहिफळे, योगेश बाळासाहेब रासने, देवा हनुमंत पवार, महारुद्र बालाजी कीर्तने, डॉ. राजेंद्र बाबासाहेब खेडकर, अनिल प्रताप ढाकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाथर्डी तालुका आढावा बैठक सकारात्मक चर्चा आणि निर्णयांसाठी महत्त्वपूर्ण ठरली


## जवाहरनगर सर्विस रोडवर ट्रॅक्टर पलटी; ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

**भंडारा । प्रतिनिधी**

जवाहरनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वरील सर्विस रोडवर ३ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता झालेल्या अपघातात एका ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

मृतक जीवन फकिरा उपरिकर (वय ४५, रा. सासरा, ता. साकोली, जि. भंडारा) हे आपल्या गावाकडे परतत असताना अपघाताचा बळी ठरले. साखर कारखान्यात ऊस पोहोचवून परतत असलेला ट्रॅक्टर (क्र. एम.एच.३६ ए.एल.८४७२) पेट्रोलपंपाजवळील सर्विस रोडवर चालकाच्या निष्काळजीपणामुळे पलटी झाला.

ट्रॅक्टर चालक अजय दिलीप रुखमोडे (वय ३५, रा. सासरा, ता. साकोली, जि. भंडारा) हे वाहन वेगात आणि निष्काळजीपणे चालवत असताना ट्रॅक्टरचे संतुलन बिघडले. ट्रॅक्टर डिव्हायडरवर जाऊन पलटी झाल्याने जीवन उपरिकर हे ट्रॅक्टरखाली दबून जागीच ठार झाले.



मृतकाच्या भावाने, राजेश फकिरा उपरिकर (वय ३४), यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जवाहरनगर पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम २८१, १०६ (१) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा नोंदवला गेला आहे.

सदर घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## जामखेड पोलीस स्टेशनच्या वतीने 'पोलिस रेझिंग डे सप्ताह निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन-पो.नि.महेश पाटील

**जामखेड । प्रतिनिधी**

पोलीस दलाच्या स्थापनेचे औचित्य साधून ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी २०२५ दरम्यान पोलीस रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत आहे.जामखेड पोलीस स्टेशनच्या वतीने दि ३ जानेवारी रोजी पोलीस रेंजिंग डे सप्ताहच्या अनुषंगाने आज दि ३ जानेवारी २०२५ रोजी जामखेड ल.ना.होशिंग विद्यालयात संपन्न झाला दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी २जानेवारी १९६१ रोजी महाराष्ट्र पोलिस विभागास ध्वज सुपूर्त केला होता. त्या दिनानिमित्त महाराष्ट्र पोलिस विभागाच्या वतीने रेझिंग डे साजरा केला जात आहे. त्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.२४ तास ऑन ड्यूटी असणा-या पोलिसांचे कामकाज कसे चालते याविषयी विद्यार्थ्यांना, माहिती व्हावी, यासाठी 'जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी



जामखेड ल.ना होशिंग विद्यालय येथे ' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी दि.३ जानेवारी रोजी जामखेड येथील विद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना पोलिस खात्याच्या कामकाजाविषयी माहिती दिली आहे.तसेच वाढत्या गुन्ह्याबाबत सविस्तर माहिती सांगितली कायद्याविषयी माहिती दिली मुलींना काही अडचण असेल तर त्यांना डायल ११२बाबत माहिती दिली आहे त्याचबरोबर पोलिसांकडील शस्त्रसाठ्याचे प्रदर्शनही भरविण्यात आले .विद्यार्थ्यांना शस्त्रांबाबत माहीती दिली. कायदया विषयी माहीती सांगीतली तसेच हत्यार व दारूगोळा बाबत माहिती दिली. यावेळी मुलांशी संवाद साधून त्यांचे प्रश्नांची उत्तरे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी दिले. अश्या प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणात पोलीस रेझिंग डे पोलीस स्टेशनच्या वतीने साजरा करण्यात आला. यासाठी जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील

यांच्याचेसह पोलीस कॉन्स्टेबल प्रवीण इंगळे,प्रकाश जाधव, अविनाश ढेरे यांनी विद्यार्थ्यांना शस्त्राबाबत माहिती दिली यावेळी ल.ना.होशिंग विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.पारखे,उपमुख्याध्यापक गायकवाड, पर्यवेक्षक राजमाने, एनसीसी प्रमुख देडे सर, राऊत सर तसेच शिक्षक वर्ग व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## प्राथमिक आरोग्य केंद्रात साफ सफाई कर्मचारी यांचा अनोखा प्रताप,बाळाची उलटी आईलाच साफ करायला लावली

**सातारा । प्रतिनिधी**

उंब्रज, तालुका कराड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिवशी उपचारासाठी आलेल्या एका चार महिन्यांच्या बाळाला उलटी झाली. ही उलटी त्याच बाळाच्या आईलाच साफ करायला लावण्याचा प्रकार येथे घडला आहे. या घटनेमुळे रुग्णालयातील अन्य रुग्णांनी खूप संताप व्यक्त केला आहे.

सदर घटना ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली. जालना भागातील एक ऊसतोड मजूर महिला आपल्या बाळाला उपचारासाठी उंब्रज प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन आली होती. गर्दीमुळे ती ब्लड प्रेशर तपासणीसाठी गेली असता, बाळ रडत असताना उलटी झाली. यावेळी बाळाची आई जवळ नसल्याने बाळाच्या उलटीचे साफसफाई करण्याची जबाबदारी रुग्णालयातील सफाई कर्मचारी




याने महिलेवरच टाकली आणि तीच उलटी साफ करायला लावली.

या घटनेमुळे उपचारासाठी आलेल्या सर्व रुग्णांनी संताप व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे याठिकाणी मेडिकल ऑफिसर असतानाही हा प्रकार घडला आहे. अनेक रुग्णांनी त्यांची संताप व्यक्त करत दवाखान्यातील औषध साठा नाही, कर्मचारी उद्धट वागत आहेत, डॉक्टर वेळेवर येत नाहीत, अशी तक्रार केली. तसेच गैरवर्तणूक करणार्या कर्मचारी यांच्यावर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेशं खलिपे यांच्याकडे याबाबत तक्रार करून योग्य ती कारवाई करण्याची नागरिकांनी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## गोळवाडी जिल्हा परिषद शाळेत आनंद नगरी मुलांनी बाजार पेठेतील व्यवहार शिकले

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत 'आनंद नगरी' विशेष उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लहान मुलांच्या बाजारात त्यांची व्यवहारिक शिकवण घेण्याची संधी मिळाली. शाळेतील मुलांनी भाजीपाला, खाण्याच्या वस्तू, खेळणी आणि शालेय साहित्य विक्रीसाठी मांडले होते, ज्यामुळे त्यांना व्यवहाराची संपूर्ण प्रक्रिया शिकता आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणासोबतच गणिताच्या क्रिया, किमती ठरवणे, आणि व्यवहारिक ज्ञान मिळवण्याचे महत्त्व कळले.

याशिवाय, या आनंद नगरीत भाग घेतलेल्या सर्व ग्रामस्थांनी मुलांचे कौतुक केले आणि त्यांना उत्साह दिला. मुलांच्या या उत्साही बाजारात मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

गोळवाडी जिल्हा परिषद शाळेतील आनंद नगरीतील उपक्रमाने मुलांना व्यवहारिक ज्ञान मिळवून दिले, ज्यामुळे त्यांच्या शालेय शिक्षणात भर पडली. मुलांना गणिताच्या बेसिक संकल्पनांचा अभ्यास, वस्तूंच्या किमती ठरवणे, विक्री व खरेदी याच्या प्रक्रियेचा थेट अनुभव घेता आला.



### अंगणवाडीमध्ये आनंद नगरीचा आनंद

**याचप्रमाणे गोळवाडीतील अंगणवाडीमध्ये देखील आनंद नगरी साजरी करण्यात आली. वाघचौरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलांनी फळभाज्यांची नावे ओळखून त्याबाबत आनंद घेतला.**

## वैजापूर नगरपालिकेचा भोंगळ कारभार व कर्मचाऱ्यांची मनमानी!




**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर येथील नगरपालिकेला अनेक वेळा स्वच्छतेचा पुरस्कार मिळाला आहे, परंतु हा पुरस्कारफक्त नगरपालिकेच्या बाहेरच स्वच्छतेवर आधारित आहे. नगरपालिकेचे कर्मचारी मात्र स्वच्छतेच्या पलीकडे काम करत असून,सामान्य नागरिकांचे काम करणारे कर्मचारी नसल्याचे दिसून येत आहे.वैजापूर तालुक्यातील दोन महिन्यांपूर्वी सिमेंट रस्त्यांचे काम झाले, मात्र दोन महिन्यांतच रस्त्यावरची सिमेंट निघून गेली आणि रस्त्यावर खड्डे पडले. त्यावेळी वैजापूरचे नागरिकांनी तक्रार केली असता, त्यांच्या तक्रारीचे निराकरण संबंधित अधिकाऱ्यांनी केले नाही. बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना लेखी तक्रार देऊनही त्यांनी कोणताही समाधानकारकउत्तर नागरिकांना दिले नाही.यामुळे नागरिकांच्या कामांमध्ये अडचणी येत आहेत.सामान्यनागरिकांना नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांकडून सतत बाहेर बसा, आमचे काम चालू आहे, काम झाल्यावर तुम्हाला बोलवू असे उत्तर मिळत आहे. वारंवार नगरपालिकेत तक्रार करूनही नागरिकांचे कामे होत नाहीत.यामुळे तेथील कर्मचाऱ्यांना कोणत्याही अधिकाऱ्यांचा धाक नाही असे दिसून येते. या संदर्भात विद्यमान आमदार व नगराध्यक्ष यांनी लवकरात लवकर नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी हस्तक्षेप करावा,अशी नागरिकांची मागणी आहे.

## शिर्डीजवळ २० एकरात उभी राहते श्रीराम सृष्टी; पीएचडी मार्गदर्शन केंद्रासह रामायण रिसर्च सेंटरची होणार उभारणी

**शिर्डी । प्रतिनिधी**

कोपरगाव तालुक्यातील चासनळी गावात २० एकर जागेमध्ये श्रीराम सृष्टीची उभारणी होत आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट श्रीरामाच्या जीवनावर आधारित विविध शिल्पे, शैक्षणिक केंद्रे, आणि पर्यटनासाठी आकर्षण केंद्रे निर्माण करणे आहे. ग्रामस्थांच्या एकत्रित प्रयत्नांनी या भव्य प्रकल्पाची कल्पना साकारली असून शासनाकडून अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय गावकऱ्यांनी लाखो रुपयांची वर्गणी एकत्र केली आहे.

श्रीराम सृष्टी चासनळी गावात गोदावरी नदीजवळ शिर्डी-सुरत मार्गावर आकार घेत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात मारीच राक्षसाचा वध यावर आधारित शिल्प तयार करण्यात आले आहे. या शिल्पाचा लोकापर्ण सोहळा साधुसंतांच्या हस्ते पार पडला. चासनळी गावाला रामायणाशी संबंधित असलेली एक ऐतिहासिक गोष्ट आहे. मान्यतेनुसार, श्रीरामाने मारीच राक्षसाचा वध करताना एक बाण चासनळी गावात पडला, त्यामुळे या गावाला चासनळी हे नाव मिळाले. श्रीराम सृष्टीमध्ये ४ भव्य प्रदेशद्वार, ४ घाट, भक्तनिवास, रामायण रिसर्च सेंटर, आणि पीएचडी मार्गदर्शन केंद्राची उभारणी करण्यात येणार आहे. याशिवाय, पर्यटकांसाठी लेझर शोसाठी यंत्रणा बसवली



जाणार आहे. ग्रामस्थांच्या मनातील या प्रकल्पाची कल्पना राज्य सरकारने निधी दिल्यानंतर गती घेतली आहे.प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १५ फूट उंच चबुतऱ्यावर २१ फूट उंच प्रभू श्रीरामांची मूर्ती उभारण्यात आली आहे. शिल्पाच्या लोकापर्ण सोहळ्याला खासदार स्वामी उमेशनाथजी महाराज आणि महामंडलेश्वर स्वामी शिवानंद गिरी महाराज उपस्थित होते. चासनळी गावाच्या पर्यटनस्थळांमध्ये समावेश झाल्यामुळे या परिसरात पर्यटनाला चालना मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

# मूल शहरात प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्रेत्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**मुल । प्रतिनिधी**

मूल शहरात प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्रीवर बंदी असूनही काही व्यक्ती छुप्या पद्धतीने याची विक्री करत आहेत. यावर कारवाई करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ३९ हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला असून आरोपी अंकुश नंदकिशोर बोडखे (३१) याला अटक केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार मुल शहरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीवरून त्यांना बाजार चौक परिसरात अंकुश बोडखे हा नायलॉन मांजाची लपून विक्री करत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे प्रसाद कॉम्प्लेक्स, बाजार चौक, मुल येथे धाड टाकली असता आरोपीच्या मालकीच्या गोडाउनमध्ये विविध रंगाच्या



प्लास्टिक चक्रांमध्ये गुंडाळलेला प्रतिबंधित नायलॉन मांजा सापडला. एकूण ४३ नग चक्रांमध्ये ३९ हजार १०० रुपयांचा नायलॉन मांजा जप्त करण्यात आला.

आरोपी अंकुश बोडखे हा मुल शहरातील वॉर्ड १४ मध्ये स्टेट बँकेच्या मागे राहतो. त्याने नायलॉन मांजा अवैधपणे विक्रीसाठी साठवून ठेवला होता. नायलॉन मांजा हा मानवी जीवन, पर्यावरण आणि पक्ष्यांसाठी हानिकारक आणि घातक आहे, हे माहित असूनही त्याने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी याची विक्री केली. या प्रकरणी बोडखेविरुद्ध पोलीस स्टेशन मुल येथे भारतीय दंड संहिता २०२३ कलम २२३, २९२, २९३ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ नुसार गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन मुल करत आहे. या कारवाईमध्ये सुदर्शन मुम्मका, पोलीस अधीक्षक चंद्रपूर, रिना जनबंधु, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनाखाली महेश कोंडावार, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि बलराम झाडोकार, संतोष निंभोरकर, नितिन साळवे, सुभाष गोहोकार, मिलिंद जांभुळे, अंमलदार स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

# आजची स्त्री सावित्रीबाई फुले यांच्या त्यागाने व कार्याने सक्षम बनली–वनिता पुजारी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

आंबेडकर फाउंडेशन व समृद्धी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भुतकरवाडी येथील स्ट्रॉबेरी प्री स्कूलमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तर महिलांची आरोग्य तपासणी करुन त्यांन निरोगी आरोग्यासाठी योगाचे धडे देण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या शैक्षणिक क्रांतीसह सामाजिक कार्याची माहिती देण्यात आली.

प्रारंभी सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी योगशिक्षिका वनिता पुजारी, नगरसेविका वंदनाताई ताठे, समृद्धी संस्थेच्या अध्यक्षा स्वाती डोमकावळे, सविता सब्बन, धनश्री काळे, विद्या राजहंस, प्रभा सोनसाळे, लांडगे मॅडम, साठे मॅडम, गुंजाळ, कचरे, पुंड, चव्हाण, दंडवते, चोपडे, साबळे, धोत्रे, सोनवणे, जोशी मॅडम आदींसह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनिता पुजारी म्हणाल्या की, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाने महिलांना शिक्षणाचा हक्क मिळाला. आजची स्त्री त्यांच्या त्यागाने व कार्याने सक्षम बनली आहे. आज महिलांनी स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देऊन व व्यायामाने सशक्त होऊन समाजाला पुढे घेऊन जाण्याचे त्यांनी सांगितले.


स्वाती डोमकावळे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनी त्यांच्या कार्याचा व विचारांचा जागर होणे आवश्यक आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी बहुजन समाजासह मुलींना शिक्षणाची दारे खुली करुन दिल्याने समाजाची प्रगती झाली आहे. त्यांचे विचार आजही सर्वांना प्रेरणादायी असून, आज देखील शिक्षणाने सामाजिक, वैचारिक व आर्थिक विषमता दूर होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वंदनाताई ताठे यांनी महिलांना बचतीचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले.

# वजनापूरात दारू प्यायला पैसे न दिल्याने पोटच्या पोराने केली बापाची निर्घृण हत्या

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील वजनापूर येथे माणुसकीला काळिमा फासणारी दुर्दैवी घटना घडली आहे. ३ जानेवारी २०२५ रोजी, दारू प्यायला पैसे न दिल्यामुळे पोटच्या पोराने आपल्या वयोवृद्ध बापावर लोखंडी खुर्चीने हल्ला करून त्याचा निर्घृण खून केला. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे. नंदू शेषराव चव्हाण (४९) याने आपल्या वडील शेषराव रंढाज्जी चव्हाण (७५) यांचा संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास लोखंडी खुर्चीने डोक्यात मारून खून केला. प्रारंभिक माहितीनुसार, दुपारी एक ते दीड वाजेच्या सुमारास नंदूने वडिलांना दारू पिण्यासाठी पैसे मागितले, पण वडिलांनी नकार दिला. त्यामुळे रागाच्या भरात नंदूने वडिलांना चापट आणि बुक्क्यांनी मारहाण केली. संध्याकाळी लोखंडी खुर्चीने डोक्यात मारल्यामुळे शेषराव यांचा मृत्यू झाला.

सदर घटना शुक्रवारी उघडकीस आली, आणि आजोबाचा खून करणाऱ्या नंदू चव्हाण



विरोधात आकाश नंदू चव्हाण याने फिर्याद दिल्यानंतर शिल्लेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

घटनेची माहिती मिळताच शिल्लेगाव पोलिसांचे पथक, पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, उपनिरीक्षक नजीर शेख, श्रीकृष्ण दाणे आणि हनुमंत सातपुते तात्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांना पाहून नंदू आरोपीने धूम ठोकली, परंतु पोलिस कॉन्स्टेबल हनुमंत सातपुते यांनी सिनेस्टाईल पाठलाग करत शेतात पळणाऱ्या आरोपीला पकडले आणि त्याच्या मुसक्या आवळून बेड्या ठोकल्या. सदर घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक नजीर शेख करत आहेत.

# प्राजक्त तनपुरे यांचा मोठा निर्णय 'ईव्हीएम' पडताळणीचा अर्ज घेतला मागे

**राहुरी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीची दाणादाण उडाली. महायुतीला २३४ असे प्रचंड बहुमत मिळाले, तर 'मविआ'ला फक्त ५० जागांवर समाधान मानावं लागलं. यात महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांना पराभवानाचा धक्का बसला. महाविकास आघाडीने या पराभवाचे खापर 'ईव्हीएम'वर फोडले. 'ईव्हीएम' मशीनमध्ये फेरफार झाल्याचा आरोप करत मतदान, डेटा पडताळणीसाठी अर्ज दाखल केले. अहिल्यानगरच्या राहुरी विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनीही जिल्हा प्रशासनाकडे अर्ज दाखल केला. परंतु आता या दाखल अर्जावर तनपुरे यांनी मोठा निर्णय घेतला आहे.

'ईव्हीएम' मशीनमधील डेटाची तपासणी आणि पडताळणीसाठी अर्ज दाखल केलेले राहुरी मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पराभूत उमेदवार प्राजक्त तनपुरे यांनी माघार घेतली आहे. तसा अर्ज




त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे. प्राजक्त तनपुरे यांनी पाच केंद्रांतील 'ईव्हीएम'विषयी शंका उपस्थित केली होती. २३नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाला असताना ३० नोव्हेंबरपर्यंतच्या डेटा तपासणीसाठी अर्ज करता येणार होते. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील बारापैकी दहा मतदारसंघातील पराभूत उमेदवारांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांकडे डेटा तपासणीसाठी अर्ज सादर केले होते.

यामध्ये संगमनेरमधून बाळासाहेब थोरात यांनी १४, शिर्डीतून प्रभावती घोगरे यांनी २, कर्जत–जामखेडमधून राम शिंदे यांनी १७, नेवाशातून शंकरराव गडाख यांनी १०, राहुरीतून प्रजाक्त तनपुरे यांनी ५, पारनेरमधून राणी लंके यांनी ५, कोपरगावातून संदीप वर्पे यांनी १, पाथर्डी–शेवगावमधून प्रताप ढाकणे यांनी २, अहमदनगरमधून अभिषेक कळमकर यांनी ३व श्रीगोंद्यातून राहुल जगताप यांनी २, अशा ७४ ईव्हीएम व व्हीव्हीपॅट पडताळणीसाठी अर्ज करण्यात आले होते.या १० पराभूत उमेदवारांनी ४७ हजार २०० रुपये प्रति मशीन शुल्कासह रक्कम भरली. मात्र या प्रक्रियेत व्हीव्हीपॅटमधील मतांची मोजणी होणार नसल्याचे स्पष्ट होताच प्राजक्त तनपुरे यांनी जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेला अर्ज माघारी घेतला. यानुसार प्राजक्त तनपुरे यांनी भरलेले शुल्क देखील परत मिळणार आहे.

## बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल येथे आनंद मेळावा

# सावित्रीबाई फुले यांची जयंती आणि फॅमिली फन डे मोठ्या उत्साहात साजरा



**मूल । प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालित बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल येथे ३ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याबरोबरच विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी फॅमिली फन डे आणि आनंद मेळावा या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून ऍड अनिल वैरागडे, अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ मूल उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून दीपक बाकडे, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, बल्लारपूर पब्लिक स्कूल मुल आणि प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार, पठाण क्रीडा असोसिएशन हैदराबादचे प्रतिनिधी, विद्यार्थी प्रतिनिधी कुमार अंश तेलसे, आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी कुमारी कशीश रामटेके मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला दीपप्रज्वलन आणि मालार्पण करून करण्यात आली. शाळेचे प्राचार्य विनोद बोलीवार यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकून प्रेरित केले, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष ऍड अनिल वैरागडे यांनीही विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर मनोगत व्यक्त केले.आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ तयार करून विक्रीसाठी प्रदर्शित केले. फॅमिली फन डे मध्ये पालक आणि विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. एकल नृत्य आणि समूह नृत्य स्पर्धेत पालकांनीही नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोषी जयस्वाल यांनी केले, आणि आभार प्रदर्शन दर्शना शैलेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या राष्ट्रगीताने झाली.

# चांदापूर हेटी येथे बालिका दिन व पालक मेळावा संपन्न



**मुल । प्रतिनिधी**

३ जानेवारी रोजी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदापूर हेटी येथे स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, आदर्श शिक्षिका आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त बालिकादिन आणि माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे उद्घाटन मंगलाताई चिंचेकार यांनी केले, तर अध्यक्ष म्हणून लोमेश तिवाडे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून उमेश नगरकर, रुपेश तिवाडे, वैशालीताई कलगटवार, शिलाताई तिवाडे, शोभाताई वरगंटीवार, वर्षाताई पाल आणि मुख्याध्यापक दिलीप भुरसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमामध्ये गीतगायन, भाषण स्पर्धा, चमचा गोळी, संगीत खुर्ची अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच, आरोग्य विषयक मार्गदर्शनासाठी परिचारीका निलिमा अवतरे, आरोग्य सेवक तुषार उईनवार, सुपरवायझर प्रिती रत्नावार, आशावर्कर वनिता मर्लेवार, आशावर्कर विद्या पोटे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वरा बट्टे हिने केले, तर प्रास्ताविक नंदकिशोर शेरकी यांनी केले. कु. श्रुती चिंचेकारने मी सावित्री बोलतेय व यश चिंचेकारने मी जोतीराव फुले बोलतोय चे अभिनय सादर केले. कु. शुभ्रा सेकुर्तीवार, कु. रिया तिवाडे, कु. नंदनी बांदुरकर, कु. वैष्णवी घोगरे व योगेश लाडवे यांनी आपली मनोगत व्यक्त केली.इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी गीतगायन केले. यावेळी चांदापूर हेटी येथील बहुसंख्य माता, पालक आणि गावकरी उपस्थित होते.

# चूल आणि मुलांच्या पलीकडे: स्त्री सक्षमीकरणाची दिशा–साबिहा अन्सारी

## वाघाये महाविद्यालयात सावित्रीबाईंच्या कार्यातून नव्या पिढीला दिशादर्शन

**भंडारा । प्रतिनिधी**

लाखनी – स्थानिक स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती प्राचार्य डॉ. कापसे यांच्या मार्गर्शनाखाली साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक साबिहा अन्सारी मार्केटिंग व्यवस्थापक चघउड यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आणि विचारांचा आदर्श घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले तसेच प्राचिन काळापासून चालत आलेली पुरुष प्रधान संकृती, ज्यामध्ये स्त्री ला फक्त चूल आणि मुल एवढ्यापुरतच मर्यादित ठेवलं होतं. स्त्रियांना कोणतेच स्वतंत्र नव्हते. सावित्रीबाईं फुले यांनी खऱ्या अर्थाने स्वतः त्रास घेऊन स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला. असे प्रतिपादन केले. याप्रसंगी डॉ. एस. एस. शेंडे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती निंत्ताने मोलाचे मार्गदर्शन केले.




अध्यक्षीय भाषणात डॉ. गणेश कापसे यांनी सावित्री बाई फुले यांना ज्योतिबा फुले यांची साथ मिळाल्यामुळे शिक्षणं क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली. कार्यक्रमांचे सूत्र संचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. पुण्यशील टेंभूर्णे यांनी केले आणि आभारव्यक्त डॉ. चंद्रशेखर देवघरे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, डॉ. सुधीर शहारे, डॉ. खाडे डॉ. करवाडे, डॉ. ढोंगे. डॉ. टीचकुले, प्रा. बसेन प्रा.तुषार डोंगरावार. प्रा.भोयर, प्रा. सागर वारांगणे, डॉ .भैसारे डॉ. यू. पी. साहरे. प्रा. बोरकर, प्रा. सिंह प्रा. सपाटे प्रा. सिंगणजुळे,प्रा.वंजारी प्रा.सूर्यवंशी प्रा.रहांगडाले प्रा. कुकडे प्रा. हलमारे तसेच शिकेत्तर कर्मचारी विलास वाघाये, बांडेबुचे, उके हणवतकर, विजय शहारे, कुंभरे ईत्यादि आणि सर्व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाची २०२५ ची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

## प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख तर प्रदेश संपर्कप्रमुखपदी रविंद्र तिराणिक ह्यांची नियुक्ती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची सन २०२५ ची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. कार्यकारिणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने, राष्ट्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान, राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश सवळे, राष्ट्रीय चिटणीस अशोकराव पवार, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, प्रदिप जोशी, राष्ट्रीय कार्यालय प्रमुख बाबाराव खडसे यांनी जाहीर केलेल्या कार्यकारीणीत खालील पदाधिकार्यांचा समावेश आहे.



महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष – कैलासबापू देशमुख, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजय देशमुख (अमरावती, विदर्भ) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दिपक नायक (पुणे, पश्चिम महाराष्ट्र), महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव देशमुख(जालना, मराठवाडा), महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र माळवे (नाशिक, उत्तर महाराष्ट्र) महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस – राजेंद्र ठाकरे (अमरावती), महाराष्ट्र प्रदेश सचिव – गोपालराव सरनायक (हिंगोली),महाराष्ट्र प्रदेश संघटक मनोज कमटे(मुदखेड,नांदेड),महाराष्ट्र प्रदेश संघटक – पप्पु कंधारे (पुणे) ,महाराष्ट्र प्रदेश संघटक – पुरुषोत्तम घोगरे – (अंजनगाव सुर्जी),महाराष्ट्र प्रदेश संपर्कप्रमुख रविंद्र तिराणिक (भद्रावती चंद्रपूर),महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख – लिंबाजी बिडवे (संभाजीनगर),महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्ध प्रमुख – सागर सवळे (चांदुरबाजार), महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्ध प्रमुख – शहजाद खान –( चांदुर रेल्वे) महाराष्ट्र प्रदेश प्रसिद्ध प्रमुख – नितीन अशोक पवार ( कुऱ्हा तिवसा) महाराष्ट्र प्रदेश कार्यलय प्रमुख – मंगेश राजनकार ( जळगांव–जामोद), महाराष्ट्र प्रदेश सल्लागार राजेंद्र बिरला (नांदेड),महाराष्ट्र प्रदेश सल्लागार धनंजय किर्तन(ज.खा.),महाराष्ट्र प्रदेश सल्लागार दत्तप्रसाद आबिलवाडे (संभाजीनगर), महाराष्ट्र प्रदेश सल्लागार घनश्याम पालीवाल (चांदुरबाजार),महाराष्ट्र प्रदेश सदस्य सर्व जिल्हा अध्यक्ष राहतील.

# भेजगाव येथील मोतीबिंदू तपासणी शिबिरात १४० रुग्णांची तपासणी

## १०५ रुग्णांची होणार शस्त्रक्रिया ;नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुल । प्रतिनिधी**

तालुक्यातील भेजगाव येथे समता फाउंडेशन मुंबई व सक्षम बहुउद्देशीय ग्रामविकास संस्था भेजगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर व उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत पीआरआय सीबीओ अभिसरण प्रकल्प यांच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले जयंतीच्या औचित्याने निशुल्क मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन ३ जानेवारी २०२५ रोजी (शुक्रवारी) भेजगाव येथील ग्रामपंचायत पटांगणावर करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मूल पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बी एच राठोड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मूल पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश गांगरेड्डीवार, तर प्रमुख अतिथी म्हणून सक्षम संस्थेचे अध्यक्ष शशिकांत गणवीर, उमेदच्या जिल्हा समन्वयक प्रसन्ना विके, उमेदचे सामाजिक समावेशन संस्था बांधणी अधिकारी संतोष वाढई, प्रभाग समन्वयक सेंद्रिय शेती रुपेश आदे, प्रभाग समन्वयक मनिष मोहुर्ले, केंद्र प्रमुख गजेंद्र कोपुलवार, मुख्याध्यापक प्रकाश निमगडे, ग्राम विकास अधिकारी उमेश आकुलवार, रोजगार सेवक विलास सोनुले, येसगाव येथील पोलीस पाटील राजु कोसरे, समता फाउंडेशनचे आकाश निकुरे, माजी ग्रामपंचायत सदस्य जालिद मोहुर्ले, अंगणवाडी सेविका निमाताई शेन्डे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. मोतीबिंदू नेत्र तपासणी शिबिराला मुल तालुक्यातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात तब्बल १४० रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी १०५ रुग्णांवर नागपूर येथील शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, वानाडोंगरी नागपूर येथे शस्त्रक्रिया केली जाणार आहे. कार्यक्रमाला शेकडो नागरिकांनी उपस्थिती दर्शवली. यशस्वी संचालन प्रितम आकुलवार यांनी केले, तर प्रास्ताविक आयोजक सामाजिक कार्यकर्त्या विशाखा गणवीर यांनी केले. आभार प्रदर्शन सारिका बावणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनोज गणवीर, हर्ष गणवीर, गुलशन लाकडे, गिताबाई गणवीर, पौर्णिमा गणवीर, ज्योती गणवीर आदींनी सहकार्य केले.



# कला कौशल्यातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास–जिल्हाधिकारी विनय गौडा

## चाचा नेहरू बाल महोत्सवाचे आयोजन

**मुल । प्रतिनिधी**



जय आणि पराजय या गोष्टीची परवा न करता मुलांनी प्रत्येक स्पर्धेत भाग घेणे आवश्यक आहे. त्यातूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. त्यामुळे मुलांना मैदानी खेळ तथा कला कौशल्य जोपासू द्या, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सव २०२४ – २५ च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी महानगरपालिका आयुक्त विपिन पालिवाल, बाल न्यायालय मंडळाच्या पिठासीन अधिकारी तथा अध्यक्ष सीमा लाडसे, नगर पालिका प्रशासन अधिकारी विद्या गायकवाड, जिल्हा कार्यक्रम अधिकारी भागवत तांबे, बालकल्याण समितीचे अध्यक्ष ङ क्षमा बारसकर, पोलिस उपनिरीक्षक अपेक्षा मेश्राम, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत आदी उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात रफी अहमद किडवई स्कूलद्वारे स्काऊट गाईड परेड आणि मशाल पेटवून करण्यात आली. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, बालकामगार, बालविवाह, बालशोषण प्रतिबंधावर यावेळी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली.प्रस्ताविकात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत म्हणाले, विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक व कौशल्यात्मक विकास व्हावा तसेच बालगृहातील मुलांना बाहेर जगातील स्पर्धांना सामोरे जाण्याचे धैर्य निर्माण व्हावे, यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यावेळी रेसलिंग स्पर्धेमध्ये यश प्राप्त करणाऱ्या प्रिती बोरकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन राणी खडसे यांनी तर आभार जिल्हा परिक्षा अधिकारी मोरेश्वर झोडे यांनी मानले.

# सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून रोटरीचे कार्य सुरु : माजी आ.धांडे

**बीड (प्रतिनिधी):** रोटरीचे काम हे कायमच समाजहित पाहून केले जाते. सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून रोटरी करत असलेल्या कामामुळे समाजातील गरजु, वंचित घटकातील नागरिकांना विविध प्रकारची मदत मिळते. आरोग्य विषयक क्षेत्रात रोटरीचे काम जगभरात आदर्शवत आहे. बीड येथील रोटरी क्लबने आपल्या कामातून वेगळा ठसा उमटिवला आहे असे प्रतिपादन माजी आमदार सुनील धांडे यांनी केले.



मातोश्री हॉस्पिटल व रोटरी क्लब बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माजी आमदार सुनील दादा धांडे व कल्याण दाजी पिंगळे यांच्या वाढदिवसानिमित्त १ जानेवारी २०२५ रोजी महाआरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिराच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. शिबिरामध्ये गरोदर मातांची मोफत सोनोग्राफी, ॠ ई.सी.जी. व रक्तदाब तपासणी, हिमोग्लोबिन व शुगरची तपासणी मोफत करण्यात आल्या. मोफत डायलेसिस व किडनी उपचार, किडनी स्टोन व प्रोस्टेट ऑपरेशन, हाडांचे फ्रॅक्चर व मणक्याचे ऑपरेशन मोफत करण्यात आले. या सुविधा महात्मा फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजने अंतर्गत उपलब्ध आहेत. पुढे माजी आ.धांडे यांनी डॉ अमोल जोगदंड व डॉ मीनल जोगदंड यांची मागील दहा वर्षाची मेहनत व अनुभव यामुळे मातोश्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल हे बीडमधील नामांकित हॉस्पिटल म्हणून उदयास आले आहे असे सांगितले. प्रास्ताविकात रोटरी क्लब बीड अध्यक्ष रो डॉ. मेघराज पिंगळे यांनी शिबिरात उपस्थित रुग्णांना मार्गदर्शन आणि हिमोग्लोबिन व शुगरची माहिती विशद केली. आभार प्रदर्शन सचिव संदीप खोड यांनी मानले. कार्यक्रमाला रोटरी क्लब बीडचे माजी अध्यक्ष रो वायजनार्दन राव कल्याण कुलकर्णी रो परमेश्वर जाधव रो विकास उमापुरकर रो गोपालजी लड्डा रो कमलेश मुंदडा रो संतोष पवार रो जीवनराव जोगदंड रो विवेक बडगे , ओमप्रकाश लोहिया प्रा सुनील जोशी महादेव जायभाय प्रोजेक्ट चेअरमन म्हणून डॉक्टर अमोल जोगदंड यांनी काम पाहिले.

# सुदर्शन फार्म कंपनी विरोधात खैरे ग्रामस्थांनी केलेला आंदोलन चिघळलं

## ५० ते ६० खैरे ग्रामस्थांवर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**महाड । प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीतील सवाने ग्रामपंचायत हद्दीतील खैरे गावाशेजारी सुदर्शन फार्मा या नावाने नवीन कंपनीचे काम चालू आहे. मागील वर्षापासून या कंपनीला येथील ग्रामस्थांचा कडक विरोध होता आणि आजही आहे. एक वर्ष उलटल्यानंतर आज पुन्हा पोलीस बंदोबस्तामध्ये या नवीन कंपनी कामाला सुरुवात झाली, कामाला सुरुवात झाल्याची बातमी ग्रामस्थांना कळताच ग्रामस्थांनी कंपनीच्या गेटवरच तीव्र आंदोलन छेडून काम बंद पाडले. तसेच जेसीबी ऑपरेटर आमच्या अंगावर जेसीबी घालण्याचा प्रयत्न करीत होता याचाच राग मनात धरून जेसीबी




व्यावसायिक तक्रारदार निसार इब्राहिम दरेकर हे घटनास्थळी आल्यानंतर त्यांच्या ताब्यातील ब्रेजा कार खैरे ग्रामस्थांनी अडवून धरली. यामध्ये जेसीबी मालक निसार दरेखाने यांना मारहाण व शिवीगाळ तसेच दमदाटी करून त्यांच्या ब्रेझा कार गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आल्याची तक्रार निसार दरेखान यांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. सुरुवातीला कमी बंदोबस्त असल्यामुळे पोलिसांची आणि ग्रामस्थांची शाब्दिक बाचाबाची देखील झाली होती, ग्रामस्थांचं तीव्र आंदोलन आणि आक्रोश पाहिल्यानंतर पोलिसांकडून बंदोबस्तामध्ये वाढ करण्यात आली. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२६(२), २८९(१), १९०, ३५२, ३५१(२),३२४ (४), ११५ प्रमाणे ५० ते ६० महिला व पुरुष खैरे ग्रामस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जगदीश गायकवाड हे या संपूर्ण गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

# बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सावेडी उपनगरात निर्मलनगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालय या संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयात विविध स्पर्धेचे, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. ग्रामस्वच्छता अभियान यामध्ये परिसराची संपूर्ण स्वच्छता विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी देखील केली. क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा संपन्न झाल्या.संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी सावेडी उपनगरात निर्मल नगर परिसरातील कष्टकरी घटकांच्या मुला–मुलींना चांगले शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांचे भविष्य घडावे या उद्देशाने प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केली. त्याचा उपयोग आज सर्वांना होत आहे.आपला वाढदिवस साजरा करताना शाळेतील मुला मुलींना आरोग्याच्या दृष्टीने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. हिवाळी क्रीडा स्पर्धा, ग्राम स्वच्छता अभियान राबविले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये लिंबू चमचा, लंगडी, खो–खो, संगीत खुर्ची, ११० मीटर धावणे, रांगोळी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे देण्यात आली. विद्यार्थ्यांना मिष्टांग भोजन देण्यात आले.विविध स्पर्धा, उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. ज्योती पवार, मंदाकिनी पांडुळे, आशा धामणे, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, संजोग बर्वे तसेच साई विद्यालयाचे मुख्याध्यापक संभाजी पवार, भरत जगदाळे, राणी राऊत आदींनी परिश्रम घेतले.

# मा.सा.कन्नमवार यांच्या रौप्य महोत्सवा निमित्त १० जानेवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चंद्रपूरात

## स्वागताध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी दिले होते निमंत्रण, विविध कार्यक्रमांचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१० जानेवारीला प्रियदर्शनी सांस्कृतिक सभागृहात आयोजित राज्याचे माजी मुख्यमंत्री, जिल्ह्याचे सुपुत्र स्व. मा. सा. कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हजेरी लावणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, माजी मंत्री शोभा फडणवीस आणि आमदार कीर्तीकुमार भांगडिया तसेच रौप्य महोत्सव समितीच्या निमंत्रणानंतर ते या सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याची माहिती कर्मवीर मा. सा. कन्नमवार १२५ वी शतकोत्तर रौप्य महोत्सव समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे.

आज मा. सा. कन्नमवार १२५ वी शतकोत्तर रौप्य महोत्सव समितीच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेला स्व. मा. सा. कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्याचे स्वागताध्यक्ष किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष अशोक पुल्लावार, लक्ष्मणराव धोबे, सचिव अवधूत कोटेवार, कार्याध्यक्ष राजेंद्र कन्नमवार, चंद्रपूर जिल्हा बेलदार समाजाचे अध्यक्ष विजय बोरगमवार, मिलिंद बंडिवार, प्रभा चीलके, विजय टोंगे, प्रभाकर पारखी, अशोक जीवतोडे, राजू बोरेवार, माजी नगर सेवक राजेंद्र अडपेवार, विनोद पेंडलीवार, अविनाश बोरगमवार, सुभाष नागुलावार, आदींची उपस्थिती होती.या पत्रकार परिषदेला संबोधित करताना स्वागताध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, राज्याचे दुसरे मुख्यमंत्री चंद्रपूरचे सुपुत्र मा. सा. कन्नमवार यांच्या जयंती निमित्त शतकोत्तर रौप्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा चंद्रपूरचे सुपुत्र आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला त्यांची उपस्थिती राहावी अशी विनंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर आपण मुख्यमंत्र्यांची वेळ घेत त्यांची मुंबई येथे सदर कार्यक्रमाचे निमंत्रण दिले होते. त्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे यासाठी आपण




आग्रही होतो. आता ते या कार्यक्रमाला उपस्थित राहतील असे त्यांच्याकडून कळविण्यात आले असून महोत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली असल्याचे ते यावेळी म्हणाले.१० जानेवारीला या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.३० वाजता लोकनेते कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांच्या पूर्णकृती पुतळ्यास माल्यार्पण करण्यात येणार आहे. तर ९ वाजता वसंत भवन येथून प्रभात फेरी काढण्यात येणार आहे. यात शाळकरी विद्यार्थी सहभागी होणार आहेत. तर १२ वाजता प्रियदर्शनी येथे आयोजित मा. सा. कन्नमवार शतकोत्तर सोहळ्याला सुरुवात होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून राष्ट्रीय इतर मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांची विशेष अतिथी म्हणून तर माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थिती राहणार आहे. सोबतच आमदार किशोर जोरगेवार यांची सदर कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून मंचावर उपस्थिती राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून खासदार प्रतिभा धानोरकर, माजी मंत्री तथा बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार सुधीर मुनगंटीवार, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले, राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे, चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार नामदेव किरसान, पदवीधर मतदार संघाचे आमदार अभिजित वंजारी, चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्तिकुमार भांगडिया, वरोरा – भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे, माजी मंत्री शोभा फडणवीस, माजी आमदार वामनराव चटप, ग्रामीण विकास संस्थेचे सचिव डॉ. राहुल कन्नमवार आदींची उपस्थिती राहणार आहे.

# वर्षभरात जिल्ह्यात २७१ कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणची उल्लेखनीय कामगिरी;६३५ व्यक्तींना मोफत विधी सहाय्य

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार किमान समान कार्यक्रमांतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व सर्व तालुका विधी सेवा समितीमार्फत जिल्ह्यात गतवर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत एकूण २७१ कायदेविषयक जनजागृती चे कार्यक्रम घेण्यात आले. यापैकी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर कार्यालयामार्फत १६१ कार्यक्रमांचा समावेश होता. तसेच जिल्ह्यातील एकूण ६३५ व्यक्तींना मोफत विधी सहाय्य देण्यात आल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार तसेच प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण चंद्रपूरच्या अध्यक्षा एस. एस. भीष्म यांच्या मार्गदर्शनात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर कार्यालय व सर्व तालुका विधी सेवा समिती कार्यरत आहेत. या कार्यालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

**लोक अभिरक्षक कार्यालय :** दिनांक १३ मार्च २०२३ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत लोक अभिरक्षक कार्यालयाची स्थापना करण्यात आली. या कार्यालयामार्फत फौजदारी प्रकरणातील न्यायालयीन बंदींना मोफत विधी सहाय्य देण्यात येते. यानुसार आतापर्यंत एकूण १८७ अर्ज प्राप्त झाले असून त्यांना मोफत विधी सेवा सल्ला व मोफत वकील उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**मनोधैर्य योजना :** लैंगिक अत्याचारग्रस्त पात्र पिडीतांना मनोधैर्य योजनेअंतर्गत आर्थिक मदत दिली जाते. सन २०२४ या एक वर्षाच्या कालावधीमध्ये एकूण १११ अर्ज प्राप्त झाले. यात पिडीतांना अंतरिम रक्कम २९ लक्ष रुपये अदा करण्यात आली आहे. तर अंतिम रक्कम मुदत ठेव स्वरूपात १ कोटी ९० लक्ष २ हजार ५०० रुपये अदा करण्यात आले. या योजनेंतर्गत सन २०२४ मध्ये एकूण प्रलंबित ४८६ अर्ज निकाली



काढण्यात आले आहेत.

**राष्ट्रीय लोक अदालत :** गतवर्षी जिल्हा मुख्यालय व सर्व तालुका न्यायालयात चार राष्ट्रीय लोक अदालत घेण्यात आल्या. यात एकूण २५५४ दाखलपूर्व प्रकरणे तर ३२८५ प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली. मोटर वाहन अपघात नुकसान भरपाई प्रकरणे एकूण ७४ निकाली काढण्यात आली असून नुकसान भरपाई ६ कोटी ८६ लक्ष ३१ हजार ८८० अदा करण्यात आले आहे. धनादेश अनादरीत झाल्याची एकूण ४१३ प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

**मध्यस्थी केंद्रातील प्रकरणे :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर व तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे मध्यस्थीसाठी पाठवले जातात. सन २०२४ मध्ये एकूण १९५३ प्रकरणे पाठविण्यात आली व त्यापैकी ४१४ प्रकरणी यशस्वीपणे मध्यस्थीने निकाली काढण्यात आली.

**नालसा टोल फ्री प्रकरणे :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार सुरू करण्यात आलेल्या नालसा टोल फ्री नंबर १५१०० द्वारे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत एकूण ९१ व्यक्तींना कायदेशीर मार्गदर्शन व विधी सेवा सल्ला देण्यात आला आहे.

**ज्येष्ठ नागरिकांना निराधार योजनेचा लाभ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत देवाडा येथील देबू सावली वृद्धाश्रमात एकूण १६ वृद्धांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना व संजय गांधी निराधार योजनेचा लाभ चंद्रपूर तहसील कार्यालयाच्या समन्वयाने मिळवून देण्यात आला.

**विशेष लोक अदालत :** दिनांक २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील तीन प्रकरणे यशस्वीपणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. तसेच मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे ३० नोव्हेंबर आणि १ डिसेंबर २०२४ या कालावधी विशेष लोक अदालत आयोजित करण्यात आली होती. यात चंद्रपूर जिल्ह्यातील पाच प्रकरणे यशस्वी तडजोडीने निकाली काढण्यात आल्याचे जिल्हा विधीसेवा प्राधिकरणचे सचिव सुमित जोशी यांनी कळविले आहे.

# सावित्रीबाई फुले यांचा लढा स्त्रीशिक्षणाचे प्रेरणास्त्रोत–आमदार किशोर जोरगेवार

## सावित्रीबाई फुले शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले यांनी आपल्या आयुष्यभर समाजातील रूढी–परंपरांविरोधात लढा दिला आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी स्त्रिया आणि मागासवर्गीयांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्या काळातील प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी हिम्मत न हारता, शिक्षणाचा दिवा पेटवत ठेवला. त्यांचा हा लढाच स्त्रीशिक्षणाचे प्रेरणास्त्रोत असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

बाबुपेठ येथील महानगर पालिकेच्या सावित्रीबाई फुले शाळेत सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालीवाल, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण अधिकारी अश्विनी सोनवने, मुख्याध्यापक नागेश निट, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कुंदा बावणे, उपाध्यक्ष राधा चिंचोळकर, माजी नगरसेवक प्रदिप किरमे, रुपेश पांडे, अमोल नालमवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, आज सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करत असताना क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे विचार मार्गदर्शक ठरतात. त्यांनी महिलांसाठी शिक्षणाचे दार खुले केले. आज महिला केवळ शिक्षितच झाल्या नाहीत, तर




प्रत्येक क्षेत्रात पुढे गेल्या आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून आमचीही जबाबदारी असून मुली शिकाव्यात, त्यांना शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. अनेक गरजू विद्यार्थिनींना आपण सायकल वितरित केली आहे. पुढेही हा उपक्रम सुरू राहणार असून गरजू विद्यार्थिनींना शाळेत येण्यासाठी सायकलचे वितरण करणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले.आजही त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा आपल्याला समानतेचा आणि शिक्षणाचा मार्ग दाखवते. आपण सर्वांनी सावित्रीबाईंच्या विचारांना आत्मसात करून शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची उन्नती साधावी, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे ते यावेळी म्हणाले. शिक्षणाच्या क्षेत्रात कोणत्याही विद्यार्थ्याला अडथळा येणार नाही. नव्या योजना आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. मुलींनी शिक्षणात पुढे जावे, नवे कौशल्य आत्मसात करावे आणि देशाच्या प्रगतीत हातभार लावावा, असे आवाहन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.यावेळी स्नेहमीलन आणि क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम आमदार किशोर जोरगेवार यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाला शिक्षकवृंद, पालकवर्ग आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे–पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

## रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यामध्ये १ ते ३० जानेवारी २०२५ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय व पोलिस विभागाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या वाहनमालक व चालकावर मोटार वाहन विभागातंर्गत कार्यवाही करण्यात येणार आहे. तेव्हा दारु पिऊन किंवा विना सिटबेल्ट तसेच विना हेल्मेट वाहने चालवू नये. सर्व नागरिकांनी वाहतुकीच्या रस्ता सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी केले.




जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या मार्गदर्शनात रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालीवाल, पोलीस निरीक्षक (वाहतूक) प्रवीणकुमार पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम, ड्राइविंग स्कूलचे संचालक, वाहन मालक व चालक, ऑटो रिक्षा संघटनेचे प्रतिनिधी, कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.मनपा आयुक्त विपिन पालीवाल यांनी शहरातील जनतेला वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे म्हणाले, अपघातात दुचाकीस्वाराचे प्रमाण अधिक असते. त्यातही डोक्याला मार लागून होणाऱ्या मृत्यूची संख्या अधिक असते. त्यामुळे हेल्मेटचा वापर अत्यंत आवश्यक आहे. वाहन चालविताना वेळेचे नियोजन करावे. वेगात वाहन चालवू नये. वाहन चालविताना संयम बाळगणे व वहातूकीच्या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. दुचाकी वर तिघेजण बसून प्रवास करू नये. कर्कश आवाज करणारे हॉर्न लावू नये, असे आवाहन त्यांनी वाहन चालक, मालकांना केले.

या कालावधीमध्ये कार्यालयात तसेच टोल नाक्यावर नेत्र तपासणी, आरोग्य तपासणीचे कार्यक्रम घेण्यात येईल. तसेच वाहतुकीच्या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या चालक–मालकावर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे म्हणाले.

कार्यालयीन अधीक्षक प्रविण अर्देकिवार यांनी उपस्थितांना अपघाताची गंभीरता, वाहन चालक व मालकाची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. सदर रस्ता सुरक्षा अभियान जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपिन पालीवाल, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम यांच्या मार्गदर्शनात करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रस्ता सुरक्षा माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवाजी विभुते यांनी तर आभार पोलीस निरीक्षक (वाहतूक) प्रवीणकुमार पाटील यांनी मानले.

# साहित्य समाजाला दिशा देण्याचे साधन–श्रीकांत मोरे

**बीड (प्रतिनिधी):** साहित्य सामाजिक जीवनाशी नक्कीच निगडित असावे, कारण साहित्य हे समाजाचा आरसा मानले जाते. समाजात घडणाऱ्या घटना, बदल, समस्या, संस्कृती, परंपरा, तसेच विचारधारा यांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये दिसून येते. साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते समाजाला दिशा देण्याचे, विचार प्रवर्तित करण्याचे, तसेच जनजागृती करण्याचे प्रभावी माध्यम आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक सहकार महर्षी श्रीकांत मोरे यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ उद्योजक सुरेश कुंकूलोळ लिखित माझ्या नोंदी व अर्थपूर्ण शोध या दोन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन नयन प्रकाशन व कुंकुलोळ परिवाराने आयोजीत केले होते,त्या सोहळ्यात श्रीकांत मोरे बोलत होते.

प्रकाशन सोहळ्यासाठी व्यासपीठावर ज्येष्ठ विचारवंत व्यकंटेश जोशी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वृक्षमित्र बाळासाहेब पानसरे, रेणूकॉर्प ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वानखडे आ. दिलीप सोपल, व्हॉईस ऑफ मिडियाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे हे मान्यवर उपस्थित होते. मोरे पुढे म्हणाले की, समाजातील विविध स्तरांतील समस्या आणि विचारसरणीवर भाष्य करतात हे दोन्ही पुस्तके भाष्य करतात. ते मानवी नातेसंबंध, समाजातील अडचणी, आणि जीवनमूल्यांवर आधारित आहेत. या साहित्यकृती समाज बदलण्यासाठी प्रेरणा देतात आणि मानवी भावभावनांचे सूक्ष्म निरीक्षण करतात. पुस्तक प्रकाशन सोहळ्यात लेखक सुरेश कुंकुलोळ यांच्या ८१ व्या वाढदिवसपूर्ती निमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. वाचन संस्कृती टिकवणे अत्यंत गरजेचे आहे, कारण वाचन ही फक्त ज्ञान संपादनाची प्रक्रिया नसून, विचारशक्तीला चालना देणारी आणि समाजाला प्रगल्भ करणारी प्रक्रिया आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल माध्यमांच्या प्रभावामुळे वाचनाची सवय कमी होत आहे, त्यामुळे वाचन संस्कृती जतन करण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते आणि रेणूकॉर्प ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वानखडे यांनी व्यक्त केले. वाचनामुळे व्यक्ती विविध विषयांवर ज्ञान प्राप्त करू शकते आणि आपल्या विचारसरणीत सुसूत्रता आणू शकते. माणूस प्रश्न विचारायला शिकतो आणि गोष्टींचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन ठेवतो, असे मत ज्येष्ठ विचारवंत व्यकंटेश जोशी यांनी व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वृक्षमित्र बाळासाहेब पानसरे म्हणाले,वाचनामुळे व्यक्तीची भाषा सुधारते, नव्या शब्दांची ओळख होते आणि लेखन कौशल्य विकसित होते. मी कुंकुलोळ यांची आज दोन्ही पुस्तकं वाचली. या दोन्ही पुस्तकांनी मला विचार करायला भाग पाडले आहे. सामाजिक क्षेत्रामध्ये आज आपण अनेक वेगवेगळ्या तडजोरी करतो. पण, या तडजोरी करत असताना मानवी मूल्य जपले पाहिजे याची शिकवण देणारे हे दोन्ही पुस्तक आहेत. असे मत या सोहळ्याचा समारोप करताना आ. दिलीप सोपल यांनी व्यक्त केले. यावेळी सुरेशचंद्रजी कुंकूलोळ यांचे व्याही व भाजपाचे ज्येष्ठ नेते सुरेशचंद्र राका यांनीही आपले मनोगत व्यक्त केले ते यावेळी म्हणाले सुरेशचंदजी कुंकूलोळ हे तत्त्वनिष्ठ व्यक्ती आहेत ते जीवनात नियमानुसार डिसिप्लेन ने चालले त्यांनी तत्त्वांसोबत कधीही समझोता केला नाही. या कार्यक्रमाला धीरजकुमार कुंकूलोळ, यांनी सर्वांचे आभार मानले.

### दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ

# क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेतून दिव्यांगाच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल–सीईओ विवेक जॉन्सन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गत तीन वर्षापासून दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या माध्यमातून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी व्यक्त केला. पोलीस मुख्यालय ग्राउंड येथे आयोजित दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या शुभारंभाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला प्रभारी पोलिस उपअधीक्षक (गृह) निशिकांत रामटेके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी धनंजय साळवे, पोलीस निरीक्षक (ग्राउंड)किसन नवघरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक गिरीश धायगुडे, इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे सचिव डॉ. मंगेश गुलवाडे, गटशिक्षणाधिकारी रवींद्र लहामगे, कैलाश उईके, निलेश पाझारे आदी उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, दरवर्षी ३ डिसेंबरला 'जागतिक दिव्यांग दिन' साजरा केला जातो. ब्रेल लिपी विकसित करणारे लुई ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग कार्यान्वित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

तसेच चंद्रपूरमध्ये जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र (ऊऊठउ) सुरू करण्यात येत आहे. दिव्यांग बांधवांचा बहुआयामी म्हणजेच, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्वरूपात विकास करण्यासाठी पावले टाकली जात आहे. शाळेत जाऊ न शकणाऱ्या दिव्यांग बांधवांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांची आरोग्य तपासणी करून प्रमाणपत्र आणि शासकीय योजनांचा लाभ देण्यात येत असून दिव्यांगाचा सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी समाज कल्याण विभागाने एक पाऊल पुढे टाकले आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य असतात. शिक्षकांनी त्यांचे कौशल्य ओळखून व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे. जेणेकरून, त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लागेल. दिव्यांग बांधवांचे व्यावसायिक कौशल्य वाढविण्यावर भर द्यावा. त्यासाठी



लागणारी अपेक्षित मदत समाजकल्याण विभागामार्फत करण्यात येणार असल्याचेही मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले.

रेडक्रॉस सोसायटीचे सचिव डॉ.मंगेश गुलवाडे म्हणाले, जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून दिव्यांगांच्या कला व सुप्त गुणांना वाव देणारे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. सीईओ विवेक जॉन्सन यांनी दिव्यांगाच्या जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र कार्यरत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. तसेच दिव्यांगाना अशा कार्यक्रमासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविकेत बोलताना जिल्हा समाज कल्याण अधिकारी धनंजय साळवे म्हणाले, जागतिक दिव्यांग दिन (३ डिसें.) हा १९९२ पासून संयुक्त राष्ट्रांनी प्रोत्साहन दिलेला आंतरराष्ट्रीय दिन आहे. अंधांना प्रेरणा देणारे लुई ब्रेल यांच्या जयंतीनिमित्त क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाच्या आणि विकासाच्या सर्व क्षेत्रात दिव्यांग व्यक्तींचे हक्क आणि कल्याण यांना प्रोत्साहन देणे दिव्यांग व्यक्तींच्या आंतरराष्ट्रीय दिनाचे उद्दीष्ट असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन रवींद्र नलगिंटवार तर आभार निलेश पाझारे यांनी मानले.या दिव्यांग क्रीडा स्पर्धेमध्ये सुमारे ३०० विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर धावणे, लांब उडी, गोळा फेक, स्पॉट जंप, बुद्धीबळ यासह विविध स्पर्धा घेण्यात येत आहे.